# अध्याय ५४ वा

श्री गणेशाय नमः। श्री सरस्वत्यै नमः । श्रीसद्गुरवे नमः॥

गुरुवर्णना नसे पार। त्याचा महिमा असे थोर ॥
भजतां भावें तरे नर। यांत आश्चर्य न कांहीं ॥१॥

पूर्वीचा सायंदेव भक्त। ऐकतसे श्रीगुरुवृत्त ॥
मार्गीं साष्टांग प्रणिपात। करून येत गाणगापुरीं ॥२॥

स्तवन करी नाना परी। दीनवत्सला कृपा करी ॥
अद्‌भूत लीला तुझ्या फारी। भक्तोद्धारा दाविसी ॥३॥

कृपाछत्र भक्तगणाला। धरून तारितां सर्वकाला ॥
मठांत सायंदेव पोंचला। लोळण घेत गुरुपदीं ॥४॥

आनंद खूप खूप होत। गुरूला नाना परी स्तवीत ॥
श्रीगुरुचे परम भक्त। गुरुकृपा पूर्ण असे ॥५॥

गुरु सांगती संगमीं स्नान। करून घ्यावें पंक्तिभोजन ॥
सायंदेव तसा येऊन। गुरुपूजन भावें करी ॥६॥

भिक्षा करवी श्रीगुरूला। गुरूसह करी भोजनाला ॥
गुरु पुसती प्रिय भक्ताला। कोठे वास काय करिसी ॥७॥

सायंदेव सहर्षें सांगत। तव कृपें क्षेम असत ॥
उत्तर कांचीस रहात। कीर्ति अपार ऐकिली ॥८॥

पुत्रबंधु संसार करिती। मना लागली ओढ अती ॥
वाटे करावी गुरुभक्ति। ठेवून घ्यावें तव पायीं ॥९॥

गुरु म्हणती फार त्रास। रानीं ग्रामीं कुठेंही वास ॥
सेवा कठीण बहुवस। दृढभावें भीती नसे ॥१०॥

तरी करावा पूर्ण विचार। मन ठेवावें सदा स्थिर ॥
सायंदेव जोडून कर। म्हणे अंतर न द्यावें ॥११॥

सेवेस राही सायंदेव। भावें सेवा करी सदैव ॥
पहावयास शिष्यभाव। तीन महिन्यानंतर ॥१२॥



एकटाच सायंदेवासी। घेऊन गुरु संगमासी ॥
जाऊन करितां गोष्टीसी। अस्तमान झाला असे ॥१३॥

श्रीगुरु परीक्षा पाहाती। वारा पाऊस येत अती ॥
गुरुवर वस्त्र धरिती। भोळे भक्त सायंदेव ॥१४॥

मध्यरात्रीं पाऊस थांबला। थंडींत कुडकुडा भरला ॥
गुरु सांगती त्या शिष्याला। गांवीं जाऊन आण अग्नि ॥१५॥

शिष्य प्रेमभरें निघाला। गुरु सांगती पुन्हां त्याला ॥
न पहावें उभय बाजूला। सरळ जाऊन ये कसा ॥१६॥

जाहला होता अंधःकार। विजेच्या तेजें जाई नर ॥
गांवीं द्वारपाला सत्वर। सांगून अग्नि घेतसे ॥१७॥

संगमाकडे निघे त्वरित। दोन्ही बाजूंकडे पहात ॥
पांच फणि नाग दिसत। घाबरून पळे त्वरें ॥१८॥

लांबून दिसले गुरुवर। दिव्य प्रकाश पाही नर ॥
वेद म्हणती विप्रवर। जवळ जातां गुरु एक ॥१९॥

केला साष्टांग नमस्कार। नागही गेले नमून दूर ॥
शिष्या भीतीची थरथर। गुरू म्हणती भीती नसे ॥२०॥

तुझें करावया रक्षण। सर्प दिधले पाठवून ॥
बाजूस पाहूं नको म्हणून। सूचना तुला दिली होती ॥२१॥

असो आतां न धरीं भय। गुरुशिष्य सदा निर्भय ॥
आकाशही स्वच्छ होय। दिसें चंद्र पौर्णिमेचा ॥२२॥

अग्नि प्रज्वलित करून। गोष्टी चालती शीत जाऊन ॥
भक्त गुरुपदीं लीन। विनवी गुरुभक्ति सांगण्या ॥२३॥

एक भावें भजावें गुरूस। त्याला कसला न बाधे त्रास ॥
याचा प्राचीन इतिहास। सायंदेवा गुरु सांगती ॥२४॥

पूर्वीं पार्वती शिवा पुसे। शिव आनंदें सांगतसे ॥
श्रीगुरुभक्ति कशी असे। ऐक गिरिजे स्वस्थ मनें ॥२५॥



श्रीगुरु जाणावा ईश्वर। गुरु आज्ञाच भक्ताधार ॥
ती पाळून भवसागर। सुखें शिष्य तरतो सदा ॥२६॥

ब्रह्मदेवाचा अवतार। त्वष्टा ब्रह्मा त्याचा कुमार ॥
उपनयन झाल्यावर। विद्या शिके गुरुगृहीं ॥२७॥

एकदां पाऊस लागला। गुरूची गळे पर्णशाला ॥
गुरु सांगतसे शिष्याला। घर करावें तूं दृढ ॥२८॥

कधीं न व्हावें तें जुनाट। मान्य करी तें शिष्य धीट ॥
गुरुपत्नी सांगे मला नीट। चोळी आणावी उत्तम ॥२९॥

वीण शिवण तिला नसावी। माझ्या अंगा समान हवी ॥
जुनी होऊन न फाटावी। शिष्य नमून मान्य करी ॥३०॥

गुरुपुत्र सांगे शिष्यास। पादुका पाहिजेत आम्हांस ॥
शीघ्र पोंचावें इष्ट स्थळास। नित्य नूतन दिसाव्या ॥३१॥

गुरु कन्येस घरकूल। त्यांत हवें साहित्य सकळ ॥
वावरावें तें सदाकाळ। आपोआपच इच्छेसम ॥३२॥

मडकींत शिजावें अन्न। परंतु काजळ न लागून ॥
पाक नित्य सिद्ध नूतन। व्यवस्था सुंदर दिसावी ॥३३॥

चौघांचाही करी आदर। घेऊन येतों म्हणे सत्वर ॥
त्यांना करून नमस्कार। गुरुनिष्ठ शिष्य, निघाला ॥३४॥

मनीं म्हणे हें कसें व्हावें। श्रीगुरुदेवा मज पावावें ॥
देवा निराश न करावे। मनोभावें नमन तुला ॥३५॥

श्रीगुरूकडे मन लावून। जातां लागे घोर कानन ॥
अवधूतरूपें दर्शन। भक्ता ईश्वर देतसे ॥३६॥

म्हणे बाळका कां सचिंत। कुमार सांगे इत्थंभूत ॥
योगी कथी चिंता समस्त। निवारी काशीविश्वेश्वरा ॥३७॥

बाळ विचारी त्याची सेवा। कशी करावी सांग तूं देवा ॥
काशीविश्वेश प्रसन्न व्हावा। दाखवा मला स्थान तें ॥३८॥

अवधूत बाळा घेऊन। मनोवेगें करी गमन ॥
काशी महायात्राविधान। सांगे हर्षे बालकासी ॥३९॥

मणिकर्णिका कुंडीं स्नान। भावें विनायकपूजन ॥
मग विश्वेश्वर दर्शन। अंतर्गृह यात्रा करीं ॥४०॥

दक्षिण मानस करून। उत्तर मानसा करीं गमन ॥
स्नान अर्चन श्राद्ध दान। यथाविधि आचरणें ॥४१॥

पंचक्रोशी यात्रा करून। भैरवांदिकांस वंदून ॥
शिवा शुद्ध मनें नमून। स्वनामें लिंग स्थापावें ॥४२॥

भवानीशंकर प्रसन्न। होऊन देई वरदान ॥
चिंता सगळी दे टाकून। तुझें कल्याण होईल ॥४३॥

असें सांगून अवधूत। तात्काळ झाला तेथें गुप्त ॥
बाळ म्हणे हाच निश्चित। शंकर सत्य दिसतसे ॥४४॥

मग मनास आला धीर। अवधूतास नमस्कार॥
चित्तीं करून भावें सत्वर। काशीयात्रा पूर्ण करी ॥४५॥

साधु असाधु सकळांसी। मुक्त करिते पुरी काशी ॥
शंकर स्वत: उपदेशी। अंतकाळीं जीवा सदा ॥४६॥

काशीस जावें नित्य वदावें। काशी काशी काशी म्हणावें ॥
शिवप्रिय स्थान बरवें। अविमुक्ता काशीपुरी ॥४७॥

वेदशास्त्रसंपन्न काशी। समस्त धर्माची ही राशी ॥
स्मरणेंच सर्व पाप नाशी। मन:पूर्वक तिला नमन ॥४८॥

होतसे शंकर प्रसन्न। बाळका मिळे वरदान ॥
विश्वकर्मा नामाभिधान। विश्वेश बाळा ठेविती ॥४९॥

बाळें वस्तु केल्या सकळ। जात गुरुगृहीं सरळ ॥
अर्पून नमितां तत्काळ। गुरु प्रसन्न होतसे ॥५०॥

सकळांना आनंद झाला। गुरूचा आशीर्वाद मिळाला ॥
धन्य धन्य तो शिष्य भला। सांगे शिव पार्वतीस ॥५१॥



गुरु म्हणजे त्रयमूर्ती। समस्त देव त्याचे हातीं ॥
गुरुसेवा दृढभाव चित्तीं। तो नर तरे भवसिंधु ॥५२॥

सायंदेवा गुरु सांगती। उदय पावला गभस्ति ॥
भक्त म्हणे श्रीगुरुप्रती। थोर लीला अघटित ही ॥५३॥

या प्रसंगीं तुम्हां सहित। असून काशींत समस्त ॥
पाहिलें वाटे यथास्थित। जागृति स्वप्न न कळे पैं ॥५४॥

गुरु सांगती त्या शिष्याला। दाविले काशीक्षेत्र तुला ॥
तव वंशीं एकविसांला। काशीयात्रा फळ मिळे ॥५५॥

आतां सेवा करीं बरवी। कांता मुलांना भेटवावीं ॥
येथें आणून मनोभावीं। म्लेंछसेवा करूं नको ॥५६॥

सायंदेवा आनंद अमित। आपुल्या गांवाकडे निघत ॥
स्त्रीमुलांसह असे येत। गुरुपदीं लोटांगण घाली ॥५७॥

कर्नाटकभाषेमधून। उत्तमोत्तम करी स्तवन ॥
श्रीगुरु अत्यंत प्रसन्न। पुसती क्षेम स्वजनां सम ॥५८॥

ज्येष्ठ मुलगा नागनाथ। त्याच्यावर कृपा बहुत ॥
वंशोवंशीं होतील भक्त। हस्त मस्तकीं ठेविला ॥५९॥

अन्य सुत कांता द्वितीय। त्यांच्यावरही कृपा होय ॥
संगमी स्नाना त्वरित जाय। अश्वत्था पुजून येतसे ॥६०॥

गुरु सांगती प्रिय शिष्यासी। आज अंत चतुर्दशी ॥
कौंडिण्य गोत्र असे तुजसी। व्रत हें घ्यावें अवश्य तूं ॥६१॥

गुरुपदीं शिष्य विनवी। तव चरणीं सोय बरवी ॥
गुरु सांगती व्रत-थोरवी। जरी सर्वत्र परमात्मा ॥६२॥

पूर्वी पांडव कृष्णभक्त। त्यांचा द्वेष कौरव करीत ॥
कपटीद्यूतें नागवीत। झाले पांडव वनवासी ॥६३॥

काननीं अपार कष्टत। द्रवले कृष्ण भगवंत ॥
वनीं जाऊन दर्शन देत। पांडव-मन उचंबळलें ॥६४॥



पांडव-पत्नी द्रौपदी सती। करी भावें भगवंत स्तुती ॥
तसेच पांडव स्तविती। वनीं पूजून कृष्णातें ॥६५॥

म्हणती देवा तूं मायाळू। आमचा म्हणविसी कनवाळू ॥
वनीं नाना कष्ट सबळू। तव कृपें आम्ही सोशितों ॥६६॥

यांतून सुटका उपाय। फक्त देवा तुझेच पाय ॥
जरी प्रसाद आपुला होय। तरीच पांडव वांचती ॥६७॥

अैकून कृष्ण भगवंत। म्हणती करूं नका खंत ॥
अनंत-चतुर्दशी व्रत। करून राज्य भोगावें ॥६८॥

सर्व कांहीं मीच एक। माझेंच व्रत अलौकिक ॥
आचरून जाईल दु:ख। अनंत-रूपें प्रसन्न मी ॥६९॥

पांडव होती प्रमुदित। पुन्हां पुन्हां भावें नमित ॥
कथा सांगतीं भगवंत। पांडव-सारथी श्रीकृष्ण ॥७०॥

भृगु-कन्या कृतयुगांत। दीक्षा नामें तिला वरीत ॥
सुमंतु ऋषि शुचिष्मंत। सुशीला कन्या गुणवती ॥७१॥

परंतु पत्नी अकालीं मृत। सुमंतु पुन्हां लग्न करीत ॥
भार्या कर्कशा त्रास देत। कन्या उपवर जाहली ॥७२॥

तिचा करावया विवाह। सुमंतु शोधी पतिगृह ॥
भाग्यें टळे मनाचा दाह। कौंडिण्य ऋषि पातले ॥७३॥

त्यांना सुशीला आवडली। सुमंतुचिंता दूर झाली ॥
कौडिण्याची कांता शोभली। सुशीला शुभा मंगला ॥७४॥

कन्येवरी ममत्व बहुत। दोन मास ठेवून घेत ॥
भाद्रपदांत पाठवीत। सर्वसिद्धा त्रयोदशी ॥७५॥

कौडिण्य निघे रथांतून। मध्यान्ह काळीं अनुष्ठान ॥
नदी तीरीं करी बसून। रथांत राही सुशीला ॥७६॥

आजुबाजूस ती पहात। सुवासिनी तिला दिसत ॥
पूजा समारंभ चालत। सुशीला गेली त्या स्थानीं ॥७७॥

स्त्रिया सांगती सुशीलेसी। आज अनंत चतुर्दशी ॥
व्रत करितां मिळे राज्यासी। अंती सद्‌गति लाभते ॥७८॥

व्रत-विधि तिला सांगून। घेतलें व्रत करवून ॥
अनंतदोरक बांधून। सुशीला नमून निघाली ॥७९॥

अनुष्ठान पुरें करून। ऋषीही येती परतून ॥
दंपत्य रथांत बसून। पुढें चाललें घराकडे ॥८०॥

नगरी दिसे शोभिवंत। प्रधानादि स्वागत करीत ॥
निवड जाहली राज्याप्रत। स्वामी चलावें सांगती ॥८१॥

दायाद आप्त इष्ट जन। सर्वांनीं केला बहुमान ॥
कौंडिण्य ऐश्वर्य भोगून। भार्येसह सुखी असे ॥८२॥

अनंत प्रसन्न जाहला। असें वाटलें सुशीलेला ॥
पण वाटे ऋषिमनाला। तपश्चर्या-फल मिळे ॥८३॥

आनंदें एकांती बसून। असतां ऋषि निरखून ॥
विचारी पत्नीस बंधन। कसलें रक्तदोरकाचें ॥८४॥

ती सांगे अनंत-विधान। अनंताचे कृपें करून ॥
राज्य मिळे अैश्वर्यवान। कृपा अद्‌भूत तयाची ॥८५॥

कौंडिण्य ऋषि रागावून। दोरक घेतला हिरून ॥
दिधला अग्नींत टाकून। सुशीला घाबरी होतसे ॥८६॥

त्वरें विझवून दुधांत। क्षमा करा असें प्रार्थित ॥
रुसला अनंत अत्यंत। वैरी बनले आप्तइष्ट ॥८७॥

नगरवासी शत्रु होती। सर्व कांहीं लुटून नेती ॥
कौंडिण्य पस्तावून म्हणती। अनंत-क्षोभ झालासे ॥८८॥

तरी आतांच माझा नेम। मला अनंत पुरुषोत्तम ॥
भेटेपर्यंत मनोरम। अन्न पाणी सर्व वर्ज्य ॥८९॥

पत्नीसह ऋषि वनांत। निघे शोधावया अनंत ॥
वृक्ष पशु तलावांप्रत। अनंत-पत्ता पुसतसे ॥९०॥



तीं सांगती माहीत नाहीं। आपली स्थिति बरी नाहीं ॥
तरी उपाय करा कांहीं। तुम्हां अनंत भेटतां ॥९१॥

कौंडिण्य ऋषि पस्तावला। अभिमान ताठा गळाला ॥
अेक भाव अनंतीं जडला। प्रत्यक्ष दर्शन होतसे ॥९२॥

वृद्ध ब्राह्मण अेक येत। सांगे दावीन मी अनंत ॥
दंपतीस घेऊन जात। स्थिर उत्तम ठिकाणीं ॥९३॥

आपण अनंत होऊन। देई दर्शन आशीर्वचन ॥
अंतीं सद्‌गति सुख भोगून। वृक्षादिकही उद्धरिले ॥९४॥

संसारीं ऐश्वर्य भोगून। अंतीं गेला स्वर्गीं निघून ॥
पुनर्वसु नक्षत्रीं स्थान। स्थिर राहिला सर्वदा ॥९५॥

धर्मराजा, विजयी होसी। राज्य कराल स्थिर मानसीं ॥
द्रौपदीसह पांडवांसी। कृष्ण-वचन सुखदायी ॥९६॥

सायंदेवा तुला मिळेल। येथें सुख गति विमल ॥
सायंदेव नमी तत्काळ। व्रत अनंत आचरी ॥९७॥

हर्षयुक्त गुरु-पूजन। करून भक्ता समाधान ॥
भार्या मुलां घरीं धाडून। आपण गुरु-सेवा करी ॥९८॥

घालवा संशय अशक्य। करीत जावें जें जें शक्य ॥
विश्वासानें श्रीगुरुवाक्य। पाळणें उत्कर्षकारक ॥९९॥

श्रीगुरुदत्ता तूं दयाळ। सर्व कांहीं तुझाच खेळ ॥
चौपन्नावा अध्याय प्रेमळ। स्वीकारीसी नमूं तुला ॥१००॥

श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु



## अध्याय ५५ वा

श्री गणेशाय नमः। श्री सरस्वत्यै नमः। श्रीसद्‌गुरवे नमः॥

गुरूची अैकून सुकीर्ती। भिक्षा करावी गुरूप्रती ॥
म्हणून अेक विप्र येती। खल्प सामुग्री घेऊन ॥१॥

तिघांपुरतें आणी अन्न। श्रीगुरुशिष्य बहुजन ॥
कसें करील हा ब्राह्मण। विप्र हंसूं लागले ॥२॥

सदा होई समाराधना। भास्करा देती आमंत्रणा ॥
तिकडे जातसे भोजना। दिवस मिळेना तयासी ॥३॥

श्रीगुरुवरी त्याची भक्ति। परी लोक उपहासिती ॥
श्रीगुरु द्रवून सांगती। आज भिक्षा तुझ्याकडे ॥४॥

ऐकून इतर कष्टी झाले। म्हणती हें संकट आले ॥
नित्य अन्न मिळे चांगलें। आज शीतही न मिळेल ॥५॥

गुरु कथिती भास्करासी। आम्ही जेवूं विप्रपंक्तीसी ॥
त्यांसहित वाढ आम्हासी। बोलाव आतां सर्वांना ॥६॥

जाऊन विप्र करी विनंती। सर्व याहो भोजनाप्रती ॥
द्विज त्याला मग सांगती। भिक्षा कर जा लौकर ॥७॥

भास्कर येऊन गुरूसी। सांगे सर्व वर्तमानासी ॥
गुरु धाडिती स्वशिष्यांसी। पाचारावया समस्तां ॥८॥

गुरु आज्ञेनें विप्र आले। त्यांना प्रेमें गुरु म्हणाले ॥
सहकुटुंब जेवा सगळे। ब्राह्मण करी समाराधना ॥९॥

सकळां आश्चर्य वाटत। पत्रावळी मांडूं लागत ॥
आपल्या वस्त्रे झांकवीत। स्वयंपाक तेव्हां श्रीगुरु ॥१०॥

अन्न केलें अभिमंत्रित। उघडूं नको अन्न म्हणत ॥
काढून वाढावें त्वरित। भास्कर पूजी श्रीगुरूला ॥११॥

सर्व चाललें व्यवस्थित। अन्न मुळींच न संपत ॥
विप्र आकंठ जेवून तृप्त। म्हणती पुरे पुरे करा ॥१२॥

द्विज बायका मुलें बाळे। गांवांतील लोक सगळे ॥
जेवून संतुष्ट जाहले। कोणी न राही उपवासी ॥१३॥

नंतर भास्कर ब्राह्मण। स्वत: करी स्वस्थ भोजन ॥
गुरु आज्ञेनें शिल्लक अन्न। जळीं सोडिलें जलचरां ॥१४॥

गरिबाची समाराधना। संतोष समस्तांचे मना ॥
श्रीगुरुराया कृपाघना। करुणा येतसे भक्ताची ॥१५॥

भास्कर गरीब ब्राह्मण। श्रीगुरुपदीं पूर्ण लीन ॥
गुरूचें मिळे आशीर्वचन। कीर्ति अपार पसरली ॥१६॥

भास्करवंश गाणगापुरीं। नांदत श्रीगुरुपूजारी ॥
श्रीगुरुकृपा भक्तावरी। नमस्कार त्यांस असो ॥१७॥

धन्य धन्य श्रीगुरुमूर्ती। त्यांना अशक्य कोणती स्थिती ॥
दृश्य अदृश्य त्यांचे हस्तीं। भक्ततारक परमात्मा ॥१८॥

भक्त लोकांसी तारावया। आपण धरी नरकाया ॥
जनांसी सुलभ व्हावया। मोक्षसाधन गुरुसेवा ॥१९॥

गुरुचरणीं बसे भक्ति। त्याचीं सर्वत्र अनासक्ति ॥
जन्म मरण फेरे चुकती। सुखानें सुखी होतसे ॥२०॥

त्रयमूर्तींचा अवतार। भक्तां वाटावा सदा धीर ॥
म्हणून घटना निरंतर। अशक्य त्याही घडवीतसे ॥२१॥

हिपरगी गांवीं गुरुभक्त। श्रीगुरूला स्वगृहीं नेत ॥
तेथे नरहरी शिवभक्त। प्रसिद्ध कवनें तयाचीं ॥२२॥

जागृत कल्लेश्वर लिंग। त्याचें पूजन करी सांग ॥
नित्य नूतन कवित्वें चांग। गाऊन तोषवी शिवाला ॥२३॥

लोक सांगती त्या विप्रास। कवनें तोषवीं गुरूस ॥
तो म्हणे मी कल्लेश्वरास। स्तवितों नको नर स्तुती ॥२४॥

गेला पूजेस देवळांत। सर्व विसरे झोंप येत ॥
लिंगस्थानी गुरु दिसत। आपण पूजी स्वप्न पडे ॥२५॥



कवित्वें गाई श्रीगुरूस। वाटला संतोष मनास ॥
झाला जागृत म्हणे उमेश। सत्य श्रीगुरु तारी जना ॥२६॥

येऊन गुरुपदीं सांगत। अपराध क्षमा करा म्हणत ॥
एकभावें पूजा करीत। स्तवून शिष्य करा म्हणे ॥२७॥

कवित्व तयांचे ऐकून। श्रीगुरु वळे आनंदघन ॥
गौरव त्याचा वस्त्र देऊन। लोक करिती गुरुआज्ञें ॥२८॥

सांगती गुरु त्या विप्रास। कल्लेश्वर श्रेष्ठ आम्हांस ॥
तो म्हणे या गुरुचरणांस। न सोडीन शिव तुम्ही ॥२९॥

गाणगापुरीं असे येत। नंदी तसा हा गुरुभक्त ॥
कवनें लोकांस आवडत। गाती तरती नरनारी ॥३०॥

गुरुकीर्ति नित्य वाढत। चहूं कडून भक्त येत ॥
गुरुमूर्ति प्रसन्नचित्त। त्यांना नमस्कार असो ॥३१॥

एकदां दिवाळी सणास। गुरुशिष्य जाती गांवास ॥
बोलाविती गुरुनाथास। आपुल्या गांवास भक्तीनें ॥३२॥

गुरु त्यांना येऊं म्हणती। सातही शिष्य पायां पडती ॥
उदास करूं नका म्हणती। कोणी धरावा भरंवसा ॥३३॥

गुरु म्हणती हे अज्ञानी। नाहीं ओळख अजून मनीं ॥
एका एकातें बोलावोनी। कानांत गुरु सांगती ॥३४॥

आम्ही येतों तुझ्या सदनीं। काळजी करूं नको मनीं ॥
कोणा न सांगतां निघोनी। जावें सत्वर गांवाला ॥३५॥

हें ऐकून शिष्य निघत। अन्या गुरु तसेंच कथीत ॥
यापरी करून समजूत। सातही शिष्यां धाडिती ॥३६॥

हें कळतां ग्रामस्थजन। येऊन करिती वंदन ॥
न करावें कोठें गमन। असें प्रार्थिती प्रेमभरें ॥३७॥

मग त्यांना गुरु सांगती। येथें राहूं न करा खंती ॥
सकळ लोक आनंदती। श्रीगुरु राहाती म्हणून ॥३८॥



दिपवाळीची त्रयोदशी। गुरु धरिती आठ रूपांसी ॥
जाती सात शिष्य घरांसी। गाणगापुरींही राहिले ॥३९॥

शिष्य ग्रामस्थ आनंदले। भक्तिभावें पूजन चाले ॥
गुप्तपणानें परत आले। नित्याप्रमाणें दिनक्रम ॥४०॥

कार्तिक शुद्ध पौर्णिमेसी। येती शिष्य गाणगापुरासी ॥
सर्व आनंदित मानसीं। म्हणती स्वगृहीं गुरु होते ॥४१॥

रात्रीं मंगलस्नान झालें। गुरूला वस्त्र अर्पण केलें ॥
गुरुपाशीं तें याही वेळे। दिसे, सांगती एकमेकां ॥४२॥

आपापली खुणा सांगती। ग्रामस्थही त्यांना म्हणती ॥
गुरुमूर्ति येथेंच होती। काय तुम्हांस म्हणावे ॥४३॥

सकळांस झाला आनंद। श्रीगुरुलीला भक्तां सुखद ॥
स्तविती प्रार्थिती भक्तवृंद। अगाध करणी गुरूची ॥४४॥

नंदीच्या घरीं कौलग्यास। गुरु जाती मोद सर्वांस ॥
तेराशें पन्नास शकास। असें वर्णन आढळे ॥४५॥

भक्तवासना ओळखून। श्रीगुरूंचें नित्य वर्तन ॥
त्यांना भावें नमस्कारून। राहाणें कल्याणकारक ॥४६॥

श्रीगुरुदेवा तूं दयाळ। भक्तांसाठी खेळ प्रेमळ ॥
तव पदीं प्रेम निर्मळ। राहो नमस्कार तुला ॥४७॥

श्रीगुरु नित्य संगमासी। सकाळीं जाती अनुष्ठानासी ॥
वाटेंत शूद्र भावें त्यांसी । दंडवत करी नेहमीं ॥४८॥

दुपारीं गुरु येतां परत। तसाच करीं दंडवत ॥
असा क्रम चाले सतत। श्रीगुरु कांहीं न बोलती ॥४९॥

एकदा सकाळीं विचारीत। काय हेतु असे मनांत ॥
शेतकरी जोडून हस्त। सांगे शेत खूप पिको ॥५०॥

यावनाळ असे शेतांत। पोटरीसी पीक दिसत ॥
तव कृपें धान्य बहुत। मिळेल मला मुनीराया ॥५१॥

शेत पाहून गुरु म्हणती। भाव असेल तुझ्या चित्तीं ॥
तर सांगतों नाहीं भीती। वाग आज्ञेप्रमाणें ॥५२॥

आम्ही दुपारीं येऊं परत। शेत कापावें तोपर्यंत ॥
सुखी होशील तूं अत्यंत। चिंता कांहीं न करावी ॥५३॥

ऐकून शेतकरी लीन। गुरु संगमीं गेले निघून ॥
गांवीं लगेच भक्त येऊन। अधिकाऱ्यांस सांगतसे ॥५४॥

मी कापणार आहें शेत। अभयपत्र द्यावें त्वरित ॥
करधान्य दिलें वर्षी गत। तसें देईन मी यंदां ॥५५॥

अधिकारी शूद्रा म्हणती। पीक आलें बहुत शेती ॥
शेतकरी म्हणे त्यांप्रती। दुप्पट धान्य देईन ॥५६॥

अभयपत्र मिळवून। श्रीगुरुभक्त आनंदून ॥
गेला माणसें जमवून। शेतांत पीक कापण्या ॥५७॥

स्त्रीपुत्र विरोध करिती। जाऊन अधिकाऱ्यां सांगती ॥
शूद्र नायके कोण्या रीतीं। अभयपत्र त्याचेकडे ॥५८॥

म्हणे जरी अधिकारी भीती। तर देईन गुरें त्यांप्रती ॥
पण पेवांत धान्य अती। म्हणून त्यांना शंका नसे ॥५९॥

पीक कोमल सर्व कापिलें। श्रीगुरुकडे चित्त वेधलें ॥
गुरु येतांच दाखविलें। शेत कापिलें तवाज्ञें ॥६०॥

गुरु म्हणती तें पाहून। विनोदें सांगितलें वचन ॥
भक्त म्हणे बोल प्रमाण। भावें शरण जातसे ॥६१॥

गुरु देती आशीर्वचन। मिळे म्हणती अपार धान्य ॥
गुरुची लीला अतर्क्य धन्य। भक्तही खरा शेतकरी ॥६२॥

करी सर्वांची समजूत। शिवमुनीवचन सत्य ॥
फलप्राप्ति होई अमित। निश्चिंत सुखी असावें ॥६३॥

आठ दिवस असे गेले। सोसाट्यताचे वारे सुटले ॥
सूर्यनक्षत्र मूल ते वेळे। पाऊस पडला पुष्कळ ॥६४॥

उभें पीक सर्व नासलें। शूद्रशेतीं अंकुर दिसले ॥
प्रत्येक मूळा धुमारे फुटले। शेत वाढलें बहुवस ॥६५॥

पत्नीपुत्र आले शरण। सांगती क्षमा दुर्भाषण ॥
शूद्र म्हणे उमारमण। प्रत्यक्ष गुरु दिसतसे ॥६६॥

शेतांतील देव पूजून। गुरुपदीं कुटुंब लीन ॥
श्रीगुरु प्रसन्न होऊन। वर्तमान काय पुसती ॥६७॥

शेतकरी सर्व सांगत। गुरु वदती धान्य अमित ॥
मिळेल नांदा सुखें सतत। लक्ष्मी अखंड तुझ्या घरीं ॥६८॥

शूद्रशेती शाळू बहुत। राज कोठारा धान्य नसत ॥
अर्धे जोंधळे देतों म्हणत। परंतु अधिकारी सांगती ॥६९॥

गतवर्षा द्विगुण धान्य। तितकेंच आहे आम्हां मान्य ॥
तसें देऊन शिल्लक अन्न। भोग श्रीगुरुकृपेनें ॥७०॥

शूद्रें राजधान्य देऊन। ब्राह्मणां दिलें बहुत अन्न ॥
गरीब जनांतें दे वांटून। त्यालाही उरे पुष्कळ ॥७१॥

श्रीगुरूचें देणें अमाप। निवारी सदा भक्तताप ॥
शेतकऱ्या आनंद खूप। वंश सुखी अजूनही ॥७२॥

धन्य धन्य श्रीगुरुदत्त। कोणा कळे त्याचें गणित ॥
सर्व ब्रह्मांड खेळवीत। आपल्या सत्तें करूनियां ॥७३॥

त्याची असे अतुल शक्ति। लोकां तारण्या तो श्रीपति ॥
स्वल्प दावी अद्‌भूत रीती। दु:ख घालवी भक्तांचें ॥७४॥

जो ब्रह्मांडें घडी व मोडी। आवडीनें पुन्हां ही घडी ॥
त्याची शक्ति असे केवढी। काळही कांपे थरथर ॥७५॥

गाणगापूर क्षेत्रस्थान। श्रीगुरु करिती पावन ॥
त्यांना असो भावें नमन। एकदां दिवाळी निमित्त ॥७६॥

श्रीगुरु सांगती लोकांसी। चला यात्रे कलत्र पुत्रांसी ॥
अष्ट तीर्थे गाणगापुरासी। आचरा भावें यथाविधि ॥७७॥

लोक आश्चर्ये थक्क होत। पुन्हां पुन्हां भावें नमीत ॥
श्रीगुरु प्रकट करीत। तीर्थ महिमा सांगून ॥७८॥

वारुणिपर्व अर्धोदय। सोमवती व महोदय ॥
कपिलाषष्ठी पुण्यमय। अमा संक्रांति पौर्णिमा ॥७९॥

ग्रहणकाळ अयनदिन। गजच्छाया वसंत दिन ॥
विविधपर्वे पुण्यदिन। स्नानदानादि करणें बरें ॥८०॥

त्यामुळें पापनाश होत। पुण्यसांठा नित्य वाढत ॥
दुष्कर्मे दुर्बळ ठरत। लाभेल सुख इहपर ॥८१॥

क्षेत्र महिमा दिव्य फार। अनुपम भाव गुरूवर ॥
ठेवितां घडे साक्षात्कार। सुखानें भक्त सुखीं जाती ॥८२॥

ज्यांचें मन शुद्ध नसत। स्वर्ग लोकीं वा नरकांत ॥
गेले तरी नसे बदलत। स्वभाव दुष्कर्म गतीचा ॥८३॥

पुण्य संपतां जन्मा येत। श्रीमंत वा साधु कुलांत ॥
पुण्यकर्मे करून परत। स्वर्गादि लोकीं जातसे ॥८४॥

अशी फेरी नित्य चालत। नरक दु:स्थिती जरी प्राप्त ॥
तरी नंतर जन्म मिळत। दु:ख कष्टादि भोगणें ॥८५॥

सर्वा सुख व्हावें प्राप्त। असें चिंतून शुद्ध चित्त ॥
विधायक वृत्ति लाभत। पुण्यमार्ग जोडतसे ॥८६॥

सर्व कर्मे ईश्वरार्पण। करून मोकळें ठेवणें मन ॥
पुण्यांतही असक्त मन। ठेवून मोक्ष लाभतो ॥८७॥

हा विचार मनीं ठेवून। वागतां श्रीगुरु प्रसन्न ॥
अष्टतीर्थे करिती जन। थोर भाग्य त्यांचें दिसे ॥८८॥

रत्नाई श्रीगुरुभगिनी। येतसे गाणगा भुवनीं ॥
भक्तिभावें नमस्कारोनी। करी स्तवन श्रीगुरूचें ॥८९॥

तिचें मागील जन्मपाप। कुष्ठरूपें देईल ताप ॥
गुरु सांगतां कुष्ठरूप। होत भगिनी हात जोडी ॥९०॥

पापविनाशीं दिवस तीन। भावें भगिनी करतां स्नान ॥
मुक्त होशील पापांतून। सांगती श्रीगुरुप्रेमानें ॥९१॥

त्यापरी रत्नाई वागत। तिचा देह सुवर्णी बनत ॥
मग ती तेथेंच राहात। मठी बांधून गुरुपायीं ॥९२॥

श्रीगुरुकृपा तिच्यावरी। तशीच भक्तां श्रीगुरु करी ॥
पाप नासून पुण्य भारी। मिळून सुखी होतसे ॥९३॥

अजाण जीवा मोक्ष प्राप्त। होण्या गौरी शिवा पुसत ॥
शंकर गुरुगीता कथीत। एक भावें तरे नर ॥९४॥

सर्व वासना मनीं त्यजून। भावें गुरुपदीं व्हावें लीन ॥
मग गुरुकृपा होऊन। भक्तशिष्य शिव होतो. ॥९५॥

सर्व एक श्रीगुरुरूप। मानून शिष्य विश्वेशरूप ॥
ओळखून शिवस्वरूप। सायुज्य मुक्ति मिळवीतसे ॥९६॥

असा गुरुगीता-भावार्थ। अैकून शिष्य होत कृतार्थ ॥
गौरीहर गुरु समर्थ। त्यांना नमस्कार असो ॥९७॥

सिद्धकृपें नामधारक। गुरु चरित्र प्रासादिक ॥
ग्रंथ लिहून अलौकिक। भक्तां तारक झालासे ॥९८॥

सर्व एक श्रीगुरुलीला। तीच आधार सदा भक्ताला ॥
शरण जाणें मार्ग चांगला। पत्करा तोच तरावया ॥९९॥

पंचावन्न अध्याय पूर्ण। दत्तगुरुपदीं अर्पण ॥
करितां श्रीगुरु कृपापूर्ण। दाविती त्यांना नमन असो ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयर्पणमस्तु



## अध्याय ५६ वा

श्री गणेशाय नमः। श्री सरस्वत्यै नमः । श्रीसद्‌गुरवे नमः।।

श्रीपाद गुरु अवतरती। श्रीनरसिंह सरस्वती ॥
गाणगापुरीं वास करिती। कीर्ति वाढली बहुवस ॥१॥

लोकांना विश्वास वाटला। वैदिक धर्म स्थिरावला ॥
गुरूच्या मनीं विचार आला । आतां गुप्त रहावें ॥२॥

श्रीपाद श्रीवल्लभ मूर्ती। रजक भक्ता वर देती ॥
जन्म झाला रजकाप्रती। बहामनी म्लेंछ राजकुलीं ॥३॥

वैदरपूर तें बेदर। राजधानी मुख्य नगर ॥
करून सत्ता अधिकार। चालविती यवन भूपति ॥४॥

म्लेंछ राजा येतसे भेटीस। गुरु सांगतां, भक्त-मानस ॥
चिंताग्रस्त, होणार त्रास। म्हणती रक्षील श्रीगुरु ॥५॥

यवन राजा रजकासी। स्फोटक जाहला मांडीसी ॥
उपाय झाले बहुत त्यासी। परंतु गुण न येतसे ॥६॥

सर्व जातींच्या प्रजेवर। असे राजाचा अधिकार ॥
म्हणून सर्व नारी नर। सुखी असोत त्याचे मनीं ॥७॥

दागिने विविध घडविले। पण सोनें एक सगळें ॥
तसें नाना धर्मीं कथिलें। सर्वव्यापक परमात्मा ॥८॥

अशी त्याची विचारधारा। ही न रुचें म्लेंछां इतरां ॥
ते सांगती त्या त्या विचारा। राजा उत्तर देतसे ॥९॥

ऐकून राज-पुरोहित। राजा अनाचारी म्हणत ॥
वैदिक धर्मीय समस्त। म्हणती त्याला चांगला ॥१०॥

उपाय सर्वही हरले। मग ब्राह्मणां बोलविलें ॥
म्हणे दुखणें बळावलें। सांगा उपाय तुम्ही तरी ॥११॥

विप्र कथिती यवनास। मागील पापें बहुवस ॥
आणिती रोग देती त्रास। पातक-नाश करावा ॥१२॥



राजा म्हणे न म्हणा यवन। सांगाल तसें मी करीन ॥
ब्राह्मण सांगती वचन। तीर्थ-स्नान करावया ॥१३॥

पापविनाश तीर्थ जवळ। राजा जाऊन करी आंघोळ ॥
एक यति येत तेजाळ। राजा नमस्कार करी ॥१४॥

म्हणे स्फोटक दु:ख फार। कृपा करावी मजवर ॥
यति सांगती रोग सत्वर। सत्पुरुष-दर्शनें जातसे ॥१५॥

राजा म्हणजे अनुभव सांगा। आणि असा महात्मा अगा ॥
कोठें भेटेल निवारी रोगा। उद्धार माझा करावा ॥१६॥

यति म्हणती सांगतों ऐक। पूर्वी अवंती-पुरी एक ॥
भ्रष्ट विप्र जोडिलीं कैक। पातकें अनाचारानें ॥१७॥

पिंगला नामें त्याची वेश्या। रत तियेसी अहर्निशा ॥
अन्यहीं स्त्रिया सुंदरशा। वेळ साधून भोगी तो ॥१८॥

स्नान-संध्या न करी कांहीं। वेश्या गृहींच सदा राही ॥
परंतु पुर्वी पुण्य काही। ऋषभ योगी पातले ॥१९॥

त्यांची दोघांनी सेवा केली। त्यांना रात्री झोंप लागली ॥
तरीही जागृत रात्रकाळीं। सेवा नाहीं चुकविली ॥२०॥

सकाळी उठून योगी गेले। दोघांचेंही पुण्य वाढलें ॥
कांहीं कालानंतर आलें। मरण पिंगला विप्राला ॥२१॥

भ्रष्ट ब्राह्मण जन्मा येत। दशार्ण देशीं राजसुत ॥
ज्येष्ठ राणी गर्भार होत। वज्रबाहु भूपतीची ॥२२॥

धाकटी राणी खिन्न होत। टपून सवतीस विष देत ॥
गर्भिणीदैव बळवंत। व्रण बहुत जाहले ॥२३॥

कष्टें होत राणी प्रसूत। पुत्रालाही व्रण असत ॥
वज्रबाहु हळहळत। उपचार केले नानापरी ॥२४॥

परंतु व्रण सदा वाढत। पहाण्यासही त्रास होत ॥
धाकटीसी आणून देत। वाकडें राजयाचे मनी ॥२५॥

मग राजा अेके दिवशीं। कांता-सुतासी अरण्यासी ॥
ठेवून येण्या स्वदासासी। सांगत असे आग्रहानें ॥२६॥

सर्व असे दैवाचा खेळ। पुत्रासह राणी विकळ ॥
नेत असतां लोक सकळ। दुःख करिती अंतरीं ॥२७॥

दोघां ठेवून अरण्यांत। येतां परत राज्यी सूत ॥
भूपतीस वृत्त कथित। राजा-राणी आनंदलीं ॥२८॥

रोगी राणी-पुत्र काननीं। पहाती हिंस्त्र प्राणी नयनीं ॥
दुष्ट जीव पिशाच योनी। पहातां भीती वाटली ॥२९॥

परंतु कोणी न दिला त्रास। शोधी हळुहळु मार्गास ॥
पुढें देखे चरत्या गुरांस। गोरक्ष कां ती पुसतसे ॥३०॥

ते सांगती पुढें नगर। तेथें वैश्य राजा पद्माकर ॥
चलावें मिळेल आधार। जात राणी मग तिकडे ॥३१॥

भूपा कळला समाचार। त्यानें देऊन एक घर ॥
रहा म्हणे करी उपचार। नगर-लोक सुखी दिसती ॥३२॥

धर्मात्मा राजा संरक्षण। करी परंतु पुत्रा मरण ॥
माता शोक करी दारुण। पुत्रा कसा रे गेलासी ॥३३॥

तूंच माझा जीवनाधार। ऐकतां शोक नारी नर ॥
दुःखें म्हणती भवसागर। दुस्तर अपार हा असे ॥३४॥

पूर्व जन्म-सेवा स्मरून। ऋषभ योगी ये धांवून ॥
राजानें सत्कार करून। कथिलें कारण शोकाचें ॥३५॥

योगी तिकडेच जाऊन। उपदेशी तिला तत्त्वज्ञान ॥
ती म्हणे मलाही मरण। पुत्राबरोबर येऊं दे ॥३६॥

मायापाश कठीण असे। योगी तिला धीर देतसे ॥
प्रेता विभूति लावीतसे। मुखींही भस्म घातलें ॥३७॥

बाळ सत्वर होत जिवंत। शरीर सुवर्णी बनत ॥
राणी-अंगही रोगरहित। धन्य सामर्थ्य ऋषभाचें ॥३८॥



सर्व नमस्कार करिती। योगी आशीर्वाद देती ॥
सर्वां आनंद होत अती। नमन असो योगीराया ॥३९॥

साधु-कृपें भद्रायुसुत। पुढे झालासे बळवंत ॥
शत्रूंस जिंकून समस्त। पित्यास नमी आदरें ॥४०॥

असा सत्पुरुष-महिमा। भीमा-अमरजा-संगमा ॥
नरसिंह सरस्वती नामा। यतिवर दिव्य रहातसे ॥४१॥

तिकडे आतां चलावें त्वरित। तेथें होशील रोगमुक्त ॥
सांगून यति गुप्त होत। धन्य लीला श्रीगुरूची ॥४२॥

विश्वास वाटला राजास। दिव्य सत्पुरुष-दर्शनास ॥
निघतसे गाणगापुरास। श्रीपादवाणी सत्य असे ॥४३॥

राजा करी पूस-तपास। भीती वाटली जनतेस ॥
ओळखून जन-मानस। राजा अभय देतसे ॥४४॥

म्हणे आलों मी भेटीस। दाखवा दिव्य सत्पुरुष ॥
लोक सांगती संगमास। आतां श्रीगुरु आहेत ॥४५॥

दुपारीं येतील गांवांत। ऐकून राजा पालखींत ॥
बसून संगमाकडे जात। निवडक नोकर घेऊन ॥४६॥

श्रीगुरुस पाही दुरून । उतरे खालीं पालखींतून ॥
चालत गेला हात जोडून। गुरु म्हणती हास्यमुखें ॥४७॥

कारे रजका कोठें असशी। बहुत दिवशी भेटलासी ॥
ज्ञान उपजे राजमानसी। स्तुति करूं लागतसे ॥४८॥

राज्य मिळे तर कृपेनें। आतां तुझे पाद सेवणें ॥
मांडीवर स्फोटक दुखणें। म्हणून आलों दर्शनासी ॥४९॥

गुरु म्हणती कोठें स्फोटक। दाखव पाहूं झालें कौतुक ॥
श्रीगुरुलीला अलौकिक। फोड नाहीं मांडी बरी ॥५०॥

भूप म्हणे गुरु माऊली। अष्टैश्वर्ये सुखें भोगिलीं ॥
पूर्व वरें भेट जाहली। अैश्वर्य माझें पहावें ॥५१॥



गुरु म्हणती तूं यवन। राज्यीं तुझ्या अधर्म वर्तन ॥
यतिसेवें हांसती जन। जा तूं आतं सुखानें ॥५२॥

राजा म्हणजे मी कैंचा यवन। रजक भक्त चरणीं लीन ॥
राजधानींत गुरो येऊन। पुनीत करावें दासासी ॥५३॥

धेनुहनन वगैरे बंद। पूर्व भाग्यें लाभलें पद ॥
आतां चरणसेवा सुखद। घडो आशा पुरवावी ॥५४॥

मग गुरु शिष्यांसहित। येऊं म्हणती तव पुरांत ॥
सुखासनावर बसवीत। राजा तेव्हां श्रीगुरूला ॥५५॥

आपण चरणीं चालत। गुरुपादुका करीं घेत ॥
गुरु सांगती राजा प्रत। अश्ववाहनीं बसावें ॥५६॥

मग राजा गुरुशिष्यासी। घोडें देई बसावयासी ॥
आपणही बसे अश्वासी। वैदुरपुरा निघाला ॥५७॥

कांहीं अंतर गेल्यावर। भूपा सांगती गुरुवर ॥
आम्ही पुढे जाऊं सत्वर। पापविनाशी भेटूं तुला ॥५८॥

आमुचें आन्हिक मार्गात। वेळीं न घडेल निश्चित ॥
म्हणून निघतों त्वरित। स्वस्थ मागून तू यावें ॥५९॥

इतुकें सांगून सत्वर। शिष्यांसह श्रीगुरुवर ॥
अदृश्य होतां चमत्कार। वाटे रजकमनासी ॥६०॥

पापविनाशीं गुरुदर्शन। घ्यावया येती बहुजन ॥
सायंदेव शिष्यनंदन। वंदन करी नागनाथ ॥६१॥

आपुल्या घरीं घेऊन जात। श्रीगुरूला शिष्यांसहित ॥
पूजा आरति सद्भावें होत। समाराधना झाली बहु ॥६२॥

देऊन आशीर्वादासी। गुरु सांगती मग त्यासी ॥
सांगितलें म्लेंछराजासी। पापविनाशीं भेटूं तुला ॥६३॥

तरी आतां तिकडे गमन। सर्व झाले चरणीं लीन ॥
पुन्हां दिले आशीर्वचन। आणि गेले शिष्यांसह ॥६४॥

इकडे राजा चिंतातुर। गुरूला म्हणे महात्मा थोर ॥
पापविनाशीं भेटणार। भावें वेगें जात राजा ॥६५॥

पापविनाशीं होते गुरु। भूपति करी नमस्कार ॥
आनंद झाला अपरंपारू। राजमानस उचंबळलें ॥६६॥

नगर सर्व श्रृंगारिलें। सन्मानानें गुरूस नेलें ॥
आपलें ऐश्वर्य दाविलें। बसवी सिंहासनावरी ॥६७॥

श्रीगुरूचे चारही शिष्य। तेव्हां मानिती फार हर्ष ॥
राजयाचा भाव विशेष। गुरूला स्तवी नानापरी ॥६८॥

पत्नी पुत्र संबंधी जन। श्रीगुरूला करिती नमन ॥
राजास नष्ट म्हणती यवन। अन्यांस वाटला चांगला ॥६९॥

भूपति करी दानधर्म। आनंदप्रसंग उत्तम ॥
श्रीगुरुभक्तकल्पद्रुम । तेथें लिहावें किती किती ॥७०॥

भिक्षुक खूप संतोषत। राजैश्वर्ये नेत्र तुष्टत ॥
श्रीगुरु आशीर्वाद देत। राजा मागे पदसेवा ॥७१॥

गुरु सांगती श्रीशैल्यासी। निघून यावें तूं सेवेसी ॥
पुत्रादि वारस राज्यासी। कृपा तुझ्यावरती असे ॥७२॥

रजक झाला यवन राजा। भावें करी श्रीगुरुपूजा ॥
राजधर्मानें पाळी प्रजा। चित्त गुरुपदी बैसलें ॥७३॥

श्रीगुरु निघाले तेथून। गोदा तीर्थी केलें गमन ॥
गोदेंत भागिरथीस्नान। सिंहेस गुरु असतांना ॥७४॥

कन्या राशीस बृहस्पति। कृष्णा होतसे भागीरथी ॥
कृष्णातीरीं शैल्य पर्वती। जाणार म्हणती श्रीगुरु ॥७५॥

गाणगापुरीं गुरु आले। सांगती स्थान प्रसिद्ध झालें ॥
यवनही येती सगळे। होईल विप्रां अडचण ॥७६॥

म्हणून तेथें गुप्त व्हावें । यात्रामिषें निघून जावें ॥
परी भक्तांनी प्रत्यय घ्यावे। येथेंच पूर्वी समान ॥७७॥



श्रीगुरुकरणी अगाध। त्यांचें चरित्र बहुविध ॥
यवन राजाही प्रसिद्ध। शिष्य झाला श्रीगुरूचा ॥७८॥

श्रीगुरु विचार करिती। धर्म दाविला जनांप्रती ॥
यवनांच्याही राजाप्रती। भक्ति उपजली उत्तम ॥७९॥

वेदधर्मा अनुसरणें। सर्वभूत हित चिंतणें ॥
आपलाही पंथ पाळणें । विधायक वृत्ति ठेवून ॥८०॥

श्रीगुरु यतिआचरण। सदा त्याचें हवें स्मरण ॥
चिंतून श्रीगुरुचरण। सुख मिळतें इहपर ॥८१॥

तत्त्व लोकांला समजलें। येथलें कार्य पुरें झाले ॥
शैल्य पर्वती गमन केलें। श्रीगुरु करणी लक्षावी ॥८२॥

लोकांस मिळे आश्वासन। अनुभव येती प्रतिदिन ॥
निर्गुण पादुका मम स्थान। वास्तव्य त्यांत निरंतर ॥८३॥

येथें राहूं गुप्तपणानें। भाव ठेवा आतां प्रमाणें ॥
भक्तांस सदा सांभाळणें। ब्रीद आमुचें सदैव ॥८४॥

जाहली होती धर्मग्लानी। लोक झाले शंकित मनीं ॥
म्हणून आलों अवतरूनी। वैदिक धर्म रक्षिण्या ॥८५॥

जशी परिस्थिती होतेसे। त्यापरी येणें घडतसे ॥
भावा ठेवावा भरंवसे। चिंता नको मुळींच ॥८६॥

ऐकतां गुरूंचे वत्सल बोल। लोकां वाटली हळहळ ॥
म्हणती गुरो तुम्ही जल। आम्ही मत्स्य सुखी होतों ॥८७॥

लोक दु:खी झाले अपार। शब्दें वर्णन न होणार ॥
श्रीगुरू नसती निष्ठुर । प्रेमं लोकां शांतविती ॥८८॥

श्रीगुरु भक्तांस सांगती। आम्ही राहातों गुप्तरीतीं ॥
ज्यांना असेल भावभक्ती। त्यांना दृश्य स्वभावें होऊं ॥८९॥

निर्गुण पादुका मठांत। चिंतामणीही येथें असत ॥
शुद्ध भावें भजा सतत। सुख होईल तुम्हांला ॥९०॥



मला आवडतें गायन। गायनीं करावें स्मरण ॥
चित्तवृत्ति चरणीं लीन। कपा होईल निश्चित ॥९१॥

मी भावाचा सदा भुकेला। भेटेन ज्यासी भाव त्याला ॥
आरती करा तिन्ही वेळां। पूजन विधी प्रमाणें ॥९२॥

आम्ही येथून नाहीं जात। परंतु राहणार गुप्त ॥
येतील येथें नाना भक्त। त्यांच्या इच्छा पुरतील ॥९३॥

गाणगापूर दिव्य स्थान। सर्वांना करील पावन ॥
येथें नसावा अभिमान। उत्तम क्षेत्र हें असे ॥९४॥

चरित्र वाचावें ऐकावें। घरींही सर्वदा पूजावें ॥
श्रद्धेनें निर्भय असावें। रक्षण निश्चयें होईल ॥९५॥

जन करिती माझी भक्ती। त्यांची काळजी मजप्रती ॥
त्यांच्या घरी मी श्रीपतीं। अखंड वसतों प्रीतीनें ॥९६॥

त्यांना चारही पुरुषार्थ। साधतील हा निश्चितार्थ ॥
सकळ सिद्धि वसतो तेथ। संशय मनीं नसावा ॥९७॥

दुष्ट बाधेचें निरसन। होऊन सुखसमाधान ॥
लाभेल रहावें सावधान। दुष्ट बुद्धि धरूं नये ॥९८॥

त्यांना नाहीं यमाचें भय। लाभ ही लाभे हा निश्चय ॥
पुत्रपौत्रादि अष्टैश्वर्य। अंतीं निर्भय मिळे मुक्ति ॥९९॥

यापरी श्रीगुरु सांगती। त्यांना असो भावें प्रणती ॥
छप्पन्नावा अध्याय येती। श्रीदत्तगुरु भक्तहिता ॥१००॥

श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु

# अध्याय ५७ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:॥

सायंदेव नंदी नरहरी । सिद्ध हे गुरु शिष्य चारी ॥
त्यांच्यासह श्रीगुरु स्वारी । निघे श्रीशैल्य यात्रेसी ॥१॥

आश्वासून गाणगापुरी । निघातां यात्रा जमे अपारी ॥
लोकांचे नेत्रीं दिसे वारी । वर्णन येथें न करवे ॥२॥

कंठ दाटून येतसे । नेत्रीं उदक गळतसे ॥
भक्तिपाश गहन असे । विचारें न जमे वागणें ॥३॥

श्रीगुरुदत्त कृपामूर्ती । पुन्हां पुन्हां लोक नमिती ॥
शिष्यांसह श्रीगुरु जाती । लोक माघारे परतले ॥४॥

मठांत दिसे श्रीगुरु यती । लोक झाले निर्भय चित्तीं ॥
लगेच गुरु गुप्त होती । धन्य त्रैमूर्ति अवतार ॥५॥

प्रात:स्नान कृष्णा-तीरीं । दुपारीं भिक्षा गाणगापुरीं ॥
अशी असे गुरु-वैखरी । भक्त मनीं सदोदित ॥६॥

पहाटेपासून नित्यापरी । क्रम चालविती पूजारी ॥
सेवा करिती सेवेकरी । श्रीगुरु रात्रीं झोंपती ॥७॥

कृपाळु श्रीगुरुदत्त-मूर्ती । नाना स्थानें प्रकट करिती ॥
भक्त-कामना पुरविती । साक्षात्कार भक्तमना ॥८॥

बहुधान्य वर्ष माघ मास । सायन कुंभ संक्रांतीस ॥
कृष्ण प्रतिपदा शुक्र दिवस । कन्या राशींत देव-गुरु ॥९॥

शक तेराशें अैंशीत । श्रीगुरु यात्रेस निघत ॥
भक्तमनें उचंबळत । मठीं पाहून भक्त सुखी ॥१०॥

श्रीमल्लिकार्जुन पर्वतीं । कृष्णेचें पात्र खोल अती ॥
पाताळगंगा तिला म्हणती । श्रीगुरु तेथें पातले ॥११॥

शिष्य वंदिती चरणासी । श्रीगुरु आज्ञापिती त्यांसी ॥
जाणें असे पैलतीरासी । पुष्पासन त्वरित करा ॥१२॥

शिष्य आणिती नाना फुलें । पुष्पासन लगेच केलें ॥
नदी-प्रवाहांत ठेविलें । त्यावर श्रीगुरु बैसले ॥१३॥

आतां होणार ताटातूट । सगुण रूपें नाहीं भेट ॥
काय होईल आमुची वाट । हीच शंका दाट मनीं ॥१४॥

धन्य धन्य श्रीगुरुनाथ । दतात्रेय स्वामि समर्थ ॥
त्यांच्या भक्तीनें जन्म कृतार्थ । नमन प्रेमं गुरुचरणीं ॥१५॥

गुरु सांगती प्रिय शिष्यांसी । चिंता करूं नका मानसीं ॥
सदा पावाल प्रत्ययासी । तुमच्याकडे मी असें ॥१६॥

तुम्हां नाहीं कसलें भय । रहावें सर्वदा निर्भय ॥
मम भक्तां सदा अभय । त्यांची प्रीती अपार मला ॥१७॥

प्रेमं शिष्यां कुरवाळिती । प्रसाद फुलें धाडूं म्हणती ॥
शेवंती पुष्पे चार येती । घ्यावी काढून चौघांनी ॥१८॥

करा त्यांचें नित्य पूजन । पावाल क्षेम समाधान ॥
अंतीं सद्‌गति सुख भोगून । आतां निश्चिंत असावें ॥१९॥

इतकें सांगून श्रीगुरु । जाते जाहले पैलपारु ॥
नावाड्यांकडे सांगती गुरु । निरोप शिष्यां प्रेमाचा ॥२०॥

शिष्य बनले चिंताक्रांत । नावाडी येती इतक्यात ॥
सांगती शिष्यां टाका खंत । आम्ही श्रीगुरु देखिले ॥२१॥

नाम नृसिंह सरस्वती । त्यांचा वेष संन्यासी यती ॥
सुवर्ण पादुका पदांप्रती । चालत जाती पलीकडे ॥२२॥

त्यांनी सांगितले तुम्हांस । गाणगापुरीं गुप्त वास ॥
आतां जातों कर्दळी वनास । प्रसाद पुष्पें येतील ॥२३॥

तेचं पुष्पें प्रवाहांतून । आलीं घेतलीं उचलून ॥
गुरु-रूप मानून वंदन । भक्तिभावें शिष्य करिती ॥२४॥

सिद्ध नामधारका सांगती । गुरु चरित्र प्रेमें अती ॥
प्रसाद पुष्पही दाविती । नामधारक समाधिस्थ ॥२५॥

सिद्ध त्यासी कुरवाळिती । देहावरी ये ये म्हणती ॥
ज्ञान राहील तुझ्या चित्तीं ।लोक कैसे तरती मग ॥२६॥

सावध होऊन वंदन । सिद्धांस आनंदें करून ॥
नामधारक चरणीं लीन । होती, सिद्ध सुखावती ॥२७॥

दिलें प्रेमें आशीर्वचन । तूं तरलासी भाष्यवचन ॥
गुरु-चरित्र केलें कथन । आतां हेंच विस्तारीं ॥२८॥

महाराष्ट्र भाषें करून । श्रीगुरुचरित्र-लेखन ॥
नामधारकें मग करून । लोकां साधन पुरविलें ॥२९॥

प्रासादिक ग्रंथ रसाळ । भक्तां आधार सदाकाळ ॥
त्यांतील कथा-भाग निर्मळ । घेतला यांत भक्तसुखा ॥३०॥

कवणही नर वा नारी । वेडी वांकडी सेवा करी ॥
पण शुद्ध भाव अंतरीं । त्याला दत्त प्रसन्न असे ॥३१॥

जाति पंथ प्रश्नच नाही । दत्त शुद्ध मानस पाही ॥
तसा भजेल विधर्मीही । तरीही दत्त प्रसन्न ॥३२॥

दिवसाचे आठ प्रहर । सारखा असे काय आचार ॥
तर काम तत्त्वानुसार । आठही प्रहर चालतें ॥३३॥

अनुकूल कालीं संवर्धन । प्रतिकूल काळीं संरक्षण ॥
असें आपुलें आचरण । चित्त आसक्त कार्याकडे ॥३४॥

घार हिंडते आकाशी । परंतु चित्त पिलांपाशीं ॥
पतिव्रता-चित्त पतीशीं । दत्त मानसीं भक्त तरे ॥३५॥

श्रीनरसिंह सरस्वती । रहाती श्रीशैल्य पर्वतीं ॥
तिकडे भक्तोद्धार करिती । चरित्र त्यांचें भक्त सुखा ॥३६॥

तीर्थ-यात्रेसी पाठविले । गुरूनीं पूर्वी शिष्य आपुले ॥
तसेच कांहीं भक्त भले । भेटती पर्वतीं श्रीगुरूला ॥३७॥

गुरुबोधाचें ग्रंथीकरण । अद्वैतदीपिका-विवरण ॥
भाव-प्रकाशिका भावपूर्ण । वेदांतसार-सुबोधिनी ॥३८॥

श्रीगुरु दत्त योगेश्वर। फिरती सर्वत्र निरंतर ॥
त्यांचें चरित्र गूढ फार। चौदा भुवनीं गरु-कीर्ती ॥३९॥

श्रीगुरु मूर्ति होई गुप्त। केव्हां कुठेंही प्रकटत ॥
स्वर्गी भूगर्भी गुरु जात। कस्तुरी गुप्त राहीना ॥४०॥

अनंत ब्रह्मांड-नायक। दाविती आचार वैदिक ॥
जीवहिताचा मार्ग एक। भिन्न धर्म त्यासी नसे ॥४१॥

त्रयमूर्तींचा अवतार। दत्तावधूत योगेश्वर ॥
नाना वेषांत निरंतर। गुप्त प्रकट फिरत असे ॥४२॥

शूल-हस्ती रुद्र शंकर। श्वानांसह फिरे भूवर ॥
सर्वजनां बोधी अमर। तसेंही वर्तन दत्ताचें ॥४३॥

शैल-पर्वतीं मल्लिकार्जुन। तेथें गुरु गुप्त होऊन ॥
राहाती, परी प्रकटून। दर्शन भक्तां होतसे ॥४४॥

शक सोळावे शतकांत। विद्वान वामन पंडित ॥
शैल पर्वती निघून जात। श्रीगुरु-उपदेश घ्यावया ॥४५॥

श्रीनरसिंह सरस्वती। त्यांना तेव्हा मार्ग सांगती ॥
श्रीरामदास ईश्वरी ज्योती। कृष्णातीरीं कार्य करी ॥४६॥

तिकडे सद्भावें जाऊन। समर्थ-पदीं व्हावें लीन ॥
बोध मिळे तसें वागून। जागृति-कार्य करावें ॥४७॥

त्याप्रमाणें येती पंडित। रामदास कृतार्थ करीत ॥
जरी ते संस्कृत पंडित। तरी कवित्व महाराष्ट्र ॥४८॥

काव्यांत यमकें भरपूर। श्लोकरचना मनोहर ॥
संस्कृत ज्ञान नारी नर। मिळविती मराठीमधून ॥४९॥

श्रीगुरु वारंवार गुप्त। केव्हां प्रकटून कार्यरत ॥
ओंकार जप मुखीं असत। जन्मापासून अखंड ॥५०॥

देहांत ध्वनि अनाहत। मनामधून वर्ण जन्मत ॥
अकार उकार मकार जुळत। ओंकार जप सहज घडे ॥५१॥



योगसामर्थ्य अलौकिक। तेथें कोता मानव तर्क ॥
ईश्वरी कार्यसूत्र अेक। मानवा कळे गुरुकृपें ॥५२॥

श्रीगुरु सर्वत्र फिरती। योगी जपी तपी यती ॥
साधूसंतां उपदेशिती। दीक्षा देण्यार्थ अवतार ॥५३॥

हिमालय दक्षिण बाजूस। एकदां गंगेच्या उत्तरेस ॥
श्रीगुरु बसती तपास। शांत सुरम्य सुस्थळीं ॥५४॥

तप करितां बहूकाळ। वाढलें गुरुवर वारूळ ॥
एक वृक्ष होता जवळ । त्याचीं लांकडें करावया ॥५५॥

त्या झाडावर वन्य नर। कुऱ्हाड मारी बुंध्यावर ॥
वारूळ फोडून मांडीवर। गुरुरायाच्या ती बसली ॥५६॥

श्रीगुरु पाहाती घावासी। आणि त्या वन्य मनुष्यासी ॥
गुरु असे कृपेची राशी। हेतु त्याचा ओळखिला ॥५७॥

बहु भ्याला अपराधी नर। स्तुति करी जोडून कर ॥
आशीर्वादें श्रीगुरु धीर। देती प्रसन्न होऊन ॥५८॥

गळालें रक्त मांडींतून। तीही झाली पूर्वी समान ॥
मात्र घावाची राहिली खूण। गुरूची शक्ति अतर्क्य ॥५९॥

जगां साठीं तो वनमाळी। नाना ठिकाणीं या भूतळीं ॥
नर देहानें योग्य काळीं। फिरून लोकां उद्धरितो ॥६०॥

जेव्हा जेव्हा गरज पडे। तेव्हां तेव्हां गुरु इकडे ॥
येऊन सांगती बोल खडे। सन्मार्गाचे सनातन ॥६१॥

गुरूचें काम काय असे। हें आपणां समजेल कसें ॥
जेव्हां विश्वासें भाव बसे। श्रीगुरुनिष्ठा अनन्य ॥६२॥

त्यावेळीं प्रकाश पडेल। ईश्वरी मार्ग सांपडेल ॥
गूढ खूप महिमा कळेल। अपराधीही उद्धरे ॥६३॥

गुरुभक्तीनें सर्व पाप। निरसून होतसे निष्पाप ॥
श्रीगुरु खरा मायबाप। लिहवी तारक गोड कथा ॥६४॥



शक पंधरावे शतकांत। गोदातीरीं फार प्रख्यात ॥
एकनाथ साधु नांदत। पैठण क्षेत्रीं गुरकृपें ॥६५॥

त्यांचे गुरु जनार्दनपंत। गुरुकृपा पूर्ण असत ॥
दत्तभेट विविध वेषांत। थोर साधु असती तें ॥६६॥

यवनराज्य बहामनी। त्याच्या शाखा पूर्णपणीं ॥
स्वतंत्र राज्य म्हणवोनी। राज्यभार चालविती ॥६७॥

दक्षिणेस विजयानगर। म्लेंछ राज्यें तीन वर ॥
गोवळ विजापूर नगर । यांचें झगडे चालती ॥६८॥

वेरूळीं ज्योतिर्लिंग घृष्णेश। तेथून जवळ किल्ला विशेष ॥
देवगिरीवर करिती वास। जनार्दनपंत आनंदे ॥६९॥

यवनराज्यीं ते नोकरी। सन्मानानें करिती बरी ॥
त्यांची सेवा एकनाथ करी। होत कृपा श्रीदत्ताची ॥७०॥

एकादश स्कंध भागवत। एकनाथ आणिती मराठींत ॥
काशीक्षेत्रीं विरोध घडत। परंतु बहुमान पावले ॥७१॥

श्रीरामप्रेरणाग्रंथ। तन्मय होऊन एकनाथ ॥
लिहिती रामायणभावार्थ। लोकहितार्थ भक्तिरसे ॥७२॥

एकनाथी भागवत ग्रंथ। विवेक वैराग्य सांगे सार्थ ॥
भावार्थ रामायण संथ। भक्तिमार्गांत स्थिर करी ॥७३॥

इतर काव्यरचना बहुत। एकनाथ भावें करीत ॥
श्रीकृष्ण त्यांच्या घरीं राबत। श्रीखंड्या म्हणती तयासी ॥७४॥

गुरूची केली अनन्य भक्ति। बनले परब्रह्म मूर्ती ॥
दत्तादि सर्व देव लक्षिती। न्यून पडेना मुळींच ॥७५॥

एकनाथ विठ्ठलभक्त। लोकां आधार वाटे नित्य ॥
विविध घटना घडवीत। जन तारिले असंख्य ॥७६॥

नरसोबावाडी जवळ। नाथपूर्वज गांव म्हैसाळ ॥
गुरु जनार्दन सांगती बोल। जावें नृसिंह वाडीला ॥७७॥

श्रीगुरुपादुकां समोर। कृष्णा नदीचें पवित्र तीर ॥
बांधितां घाट गुरुवर। तोषती तरती नर नारी ॥७८॥

तसा घाट नाथ बांधीत। श्रीगुरुदत्त प्रसन्नचित्त ॥
एका जनार्दना सद्‌गुरु सहित। साष्टांग प्रणिपात असो ॥७९॥

भक्तिरसाचा दिव्य सागर। नाना शाखा दूरवर ॥
पसरती होती चमत्कार। दिव्यत्व पटे लोकांना ॥८०॥

प्रतिकूल कालखंडांत। नाना भक्तांस बोधी दत्त ॥
वैदिक ध्वज उंचावत। कर्तृत्व सूक्ष्म पहावें ॥८१॥

गुरुचरित्र पवित्र ग्रंथ। पूर्ण करी भक्त मनोरथ ॥
वैदिक धर्म सुकृतार्थ। गुरुनाथ दत्त दावीतसे ॥८२॥

आंबे जोगाईत भक्त। श्रीदत्तगुरुकृपापूरित ॥
दासोपंतमहिमा बहुत। लेखन समुद्रासमान ॥८३॥

दत्तअवतार षोडश। दासोपंत पूर्ण षोड़श ॥
मानिती शिष्य भक्त विशेष। सर्वां नमस्कार असो ॥८४॥

विजयानगर राजवंश। चंद्रगिरींत करी प्रवेश ॥
त्यांचा जेव्हां होतसे नाश। त्याच वर्षी महाराष्ट्रीं ॥८५॥

गोब्राह्मणप्रतिपालक। छत्रपति राज्याभिषिक्त॥
शिव भूपति ध्वजा वैदिक। रायगडावर फडकविती ॥८६॥

त्यांचे सद्‌गुरु रामदास। त्यांचें साह्य सर्वदा त्यांस ॥
गुप्त प्रकट प्रकारें खास। गुरुशिष्यां नमन असो ॥८७॥

रामराजा लोकां मिळाला। वैदिक धर्म बळावला ॥
त्या साठींच जीवन कळा। फुलो जनांचा दत्तकृपें ॥८८॥

नारायण श्रीरामदास। आळविती श्रीगुरु दत्तांस ॥
समर्थ बनले ते लोकांस। दासबोधग्रंथें बोधिती ॥८९॥

मनाचे श्लोक करून। इतर भाविक लेखन ॥
प्रपंच परमार्थ साधवून। कृपें लोकांस तारिती ॥९०॥



महानुभाव चक्रधर। नाना पंथी साधु अपार ॥
दत्तभजक निरंतर। दत्तचरित्र गूढ असे ॥९१॥

विजापूरचा राजा यवन। श्रीगुरूकृपें रोग जाऊन ॥
होतां चांगला, नृसिंहस्थान। निर्मी विजापुरीं दत्ताचें ॥९२॥

श्रीदत्तस्वरूप दिव्य। लोकां दर्शन असं भाव्य ॥
लोकांचे शुभ भवितव्य। घडविण्या अवतार ते घेती ॥९३॥

केवढाही प्रतिकूल काल। असला तरीही शुभ काल ॥
दृढचिंतनें दत्त दयाळ। अनिष्टें निरसून देतसे ॥९४॥

जग ज्यानें निर्माण केलें। त्याचेंच जाणावें हें सगळें ॥
हें नोळखून गवसलें। तें आपलें मूढ म्हणती ॥९५॥

ही वृत्ति मनीं त्यजून। जगदीश भावें ओळखून ॥
भजून दत्ता व्हावें लीन। मग दयाघन द्रवेल ॥९६॥

श्रीनृसिंह सरस्वती। नरदेहानें वृद्ध दिसती ॥
परंतु योगेश दत्त यती। शतकानुशतकें देह रक्षी ॥९७॥

कर्ता करविता परमेश्वर। आपणां नसे अधिकार ॥
हें जाणून जोडून कर। दत्ता शरण रिघावें ॥९८॥

वैदिक ब्राह्मण दत्तयती। श्रीनरसिंह सरस्वती ॥
कर्दळीवनीं शैल पर्वतीं। होती गुप्त, प्रकट पुन्हां ॥९९॥

जगा तारक गुरुदत्त। प्रेमें अध्याय स्वीकारीत ॥
सत्तावन्नावा भक्तहित। करील दत्तकृपें सदा ॥१००॥

श्रीगुरुदत्तात्रेयर्पणमस्तु



# अध्याय ५८ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्‌गुरवे नम:।।

बालार्कप्रभा प्रकाशत। नीलजटा भस्मचर्चित ॥
शांत नाद विलीन चित्त। ओंकार जप सर्वदा ॥१॥

शार्दूलचर्म आवडत। साक्षात्कारी निकट संत ॥
सिद्ध योगीही सदा प्रार्थित। प्रेमें दत्ता नमन असो ॥२॥

स्वामिसमर्थ दत्तावधूत। त्यांना साष्टांग प्रणिपात ॥
यज्ञसत्रीं मुरगोडांत। स्वामिराज कृपा करिती ॥३॥

मुरगोड कर्नाटकांत। धार्मिक मल्हार दीक्षित ॥
पुत्रासाठीं मनीं झुरत। गेले क्षेत्रीं रामेश्वरीं ॥४॥

चिदंबरेश्वर दिव्यस्थान। तेथें तपा मनापासून ॥
करितां स्वप्नांत दर्शन। देऊन शंकर सांगती ॥५॥

पुत्र नाहीं सात जन्मांत। ऐकून दिक्षित जागृत ॥
मनोभावें शिवा प्रार्थित। पुत्र हवा दया करा ॥६॥

त्यांचें पाहून एकाग्र मन। शिव देती आशीर्वचन ॥
मीच येतों पुत्र होऊन। चिंता कांहीं न करावी ॥७॥

तपाची सांगता करून। मुरगोडास आगमन ॥
पत्नी गर्भिणी होऊन। लक्षणें दिसती दिव्यशीं ॥८॥

शुभ दिवशीं पुत्र जन्मत। कर्णीं बिल्वपत्र दिसत ॥
जातसंस्कार सर्व होत। चिदंबर नाम ठेविलें ॥९॥

शिवांश पुत्र-लीला पाहून। आनंदी मल्हार ब्राह्मण ॥
उक्तकालीं उपनयन। करून विद्या पढविली ॥१०॥

गांवांत गज-गौरी व्रत। पूजा सांगण्या चिदंबर जात ॥
पूजन चाले जशी पद्धत। गणपति-पूजन आरंभीं ॥११॥

गणेश देवता प्रत्यक्ष येत। मातीचा गज चालूं लागत ॥
नवल वर्तलें अद्‌भूत। गांवांत वार्ता पसरली ॥१२॥

पातले मल्हार दीक्षित। नमून पुत्रा विनवीत ॥
आपण शंकर साक्षात। परंतु घोर कलियुग ॥१३॥

तरी तव अवतारकार्य। योग्य वेळीं करा सुखमय ॥
तूर्त गुप्त राहून कार्य। करीत जावें मज गमे ॥१४॥

वडिलांना मान देऊन। चिदंबर करिती वर्तन ॥
गणपति गुप्त होऊन। गजही अचल होतसे ॥१५॥

चिदंबर गृहस्थ होती। त्यांना भार्या दोन असती ॥
पुत्र संतति व संपत्ति। शिवसंसार सुखी असे ॥१६॥

जननी जनक पुण्यवान। योग्यवेळीं देह त्यजून ॥
गांठती कैलास भुवन। सर्वां नमस्कार असो ॥१७॥

चिदंबर दीक्षित सतत। विविध यज्ञ प्रेमें करीत ॥
देवदर्शनें त्यांत घडत। अन्यही चत्मकार बहू ॥१८॥

यज्ञार्थ आयति वहुत। लांब लांबून ब्राह्मण येत ॥
लक्षावधि भोजनें होत। विप्र आकंठ जेविती ॥१९॥

त्या वेळचें वर्णन वाचून। आश्चर्ये थक्क होई मन ॥
तेथें यज्ञांत तूप वाढून। यज्ञपूर्तता गुरू करिती ॥२०॥

एकदां पहिली पंगत। उठून दुसरी बैसत ॥
दुसरे बाजीराव येत। पेशवे ससैन्य दर्शना ॥२१॥

त्यांचा योग्य मान राखून। चिदंबर देती भोजन ॥
होतें जरी पुष्कळ सैन्य। तरी सर्वांस त्यावेळीं ॥२२॥

परी तेव्हां तूप संपलें। चिदंबरांसी कळविलें ॥
ते म्हणती घृत चांगलें। पाणी मलप्रभेचें ॥२३॥

तें तापवून घ्या गाळून। तसें तूप मिळालें छान ॥
पेशव्यांचें चकित मन। म्हणती दिव्य विप्र हे ॥२४॥

श्रीचिदंबर प्रसाद देती। घेऊन स्वयें ते न रक्षिती ॥
वागण्याची ही राजपद्धती। करी अवनति सर्वदा ॥२५॥



श्रीगुरुशिष्य नंदी थोर। त्यांचे शाखेंत शिष्यवर ॥
ब्रह्मानंदें दिधला वर। पहिले बाजीरावांसी ॥२६॥

निष्ठेनें राज्य विस्तारलें। ती निष्ठा दुसऱ्यांत मावळे ॥
म्हणून राज्य गमावलें। होणार तशी बुद्धि दिसे ॥२७॥

देव गुरु यज्ञ ब्राह्मण। साधुसंत चरणीं लीन ॥
केवढाही असला कोण। तरी त्यानें असणें भलें ॥२८॥

अश्व गज शिबिका रथ। चिदंबरांकडे ते समर्थ ॥
सतेज ठेवण्या धर्मपंथ। शिव आनंदे अवतरती ॥२९॥

तूप इतर गांवांतले। दुसऱ्या दिवशीं आणिले ॥
दीक्षित म्हणती त्यावेळे। उसनें फेडा गंगेचें ॥३०॥

जितकें पाणी आणविलें। सपाद तूप ओतविलें ॥
गंगेंत ओतितां दिसलें। तुपाची धार स्वच्छ पाणी ॥३१॥

महायज्ञही संपूर्ण होत। कांहीं कुठे उणें नसत ॥
स्वामि समर्थ दत्तावधूत। शिवलीला त्यांस कळे ॥३२॥

यज्ञकामें सदा चालत। भोजन पदार्थ बहुत ॥
ठेवण्यासाठी हौद असत। नित्य स्वच्छ तें धुती ॥३३॥

वस्त्रानें काढिती पुसून। नंतर ठेविती भरून ॥
विपुल पदार्थामधून। काढून घेऊन वाढिती ॥३४॥

एकदां तरुण ब्राह्मण। आमटी काढी हौदांतून ॥
अकस्मात पाय निसरून। हौदांत पडतां आकांत ॥३५॥

आमटी होती फार उष्ण। युक्तीनें काढिला ब्राह्मण ॥
परंतु विप्र गतप्राण। चिदंबरांस समजलें ॥३६॥

ते प्रार्थिती श्रीगुरूसी। निवारण्या या संकटासी ॥
श्रीगुरु द्रवलें मानसीं। म्हणती निर्भय असावें ॥३७॥

जवळ आणविती प्रेत। सर्वांगा हळद लाववीत ॥
पांघरूण वर घालीत। आणि थोपडिती प्रेमाने ॥३८॥



गुरु म्हणती तुझे प्राण। नाहीं कोणीं नेले हिरून ॥
तूं झोंपसी बाळा श्रमून। तरी उठून तांबूल दे ॥३९॥

मृत द्विज जिवंत होत। श्रीगुरूची स्तुति करीत ॥
जरी मरण झालें प्राप्त। तरी मंगल त्यां केले ॥४०॥

मग त्या विप्रा मंगल स्नान। घालून इतर ब्राह्मण ॥
विधिपूर्वक शुद्ध स्नान। करून नमिती श्रीगुरूला ॥४१॥

नांव ठेविती गुरुदत्त। मृत ब्राह्मणा यज्ञदत्त ॥
पीतांबर नेसून त्वरित। यज्ञदत्त तांबूल दे ॥४२॥

ज्या हौदांत विप्र पडला। तो मग कोरडा बनला ॥
तो धुवून पुन्हां चांगला। पूजन केलें आनंदें ॥४३॥

त्यांत आमटी पुन्हां घालीत। पण न भरे कांठापर्यंत ॥
सर्वही आश्चर्यचकित। चिदंबर स्तविती श्रीगुरुला ॥४४॥

यज्ञदत्ता गुरु सांगती। संध्येची पळी घ्यावी हाती ॥
पळीभर पाणीं त्वरित गती। घाल हौदांत यावेळी ॥४५॥

तो नमून तसें करीत। हौद उसळून वर येत ॥
भरला शीघ्र कांठापर्यंत। आमटी पुन्हां न घालतां ॥४६॥

सर्वांना वाटला विस्मय। अपायामधून उपाय ॥
जेथें असती गुरुराय। तेथें न्यून न टिकतें ॥४७॥

चिदंबर व दिगंबर । भक्तां रक्षिती निरंतर ॥
त्यांना करुया नमस्कार। आशीर्वाद त्यांचा असे ॥४८॥

नाना स्थानीं गुरु फिरती। पूर्वस्वर्गीं तिबेटीं जाती ॥
दलाई लामाही भेटती। चरित्र गूढ श्रीगुरूचें ॥४९॥

गुरु होते हिमालयांत। वनौषधि नेण्यानिमित्त ॥
चिनीं दंपत्य तेथें येत। गुरूला पाहून हंसतसे ॥५०॥

कांहीं तरी मुखें वदत। दाट झाडींत निघून जात ॥
स्त्रीपुरुष भोग भोगीत। परंतु विपरीत जाहलें ॥५१॥

पत्नी बनलीं तेव्हां नर। नवरा बायको सत्वर ॥
चिनीं दंपती चिंतातुर। श्रीगुरु हंसूं लागले ॥५२॥

जोडपें मनात म्हणालें। आपण गुरूला निंदिलें ॥
म्हणून असें सत्य झालें। तरी शरण रिघावें ॥५३॥

पस्तावून विनम्र होती। नानापरी स्तुति करिती ॥
श्रीगुरुदत्त प्रेमें द्रवती। दंपती होई पूर्ववत ॥५४॥

गुरूंचा आशीर्वाद घेऊन। स्वदेशीं करिती गमन ॥
मग मुलांसह भजून। सुखी इहपर गुरुकृपें ॥५५॥

हिमालय पर्वतावर। हेमंत कालीं यतिवर ॥
बसले आत्मानंदीं स्थिर। अेका आम्रवृक्षातळीं ॥५६॥

जवळ पाण्याची तळी होती। जल प्यावया हरिण येती ॥
चार व्याध साधव असती। पारध करण्याकारणें ॥५७॥

मृग बालक सकंपित। धांवत गुरूकडे येत ॥
व्याध फार तीर सोडीत। बंदुकबारही काढिती ॥५८॥

परी गुरु मृगपाडस। स्वस्थ असती न पोंचे त्रास ॥
व्याधांचें विस्मित मानस। म्हणती मांत्रिक हे बुवा ॥५९॥

गुरु पाहाती व्याधांकडे। आणि फेंकिती दोन खडे ॥
अपूर्व चमत्कार घडे। व्याध जाहले तटस्थ ॥६०॥

बंदुक तीर व्याधशरीर। हाले वळेना तसूभर ॥
देह ही नाहीं शुद्धीवर। दोन प्रहर गेले असे ॥६१॥

मग गुरु कळवळत। म्हणती धर्में वागा सतत ॥
क्षेम पावा दया मनांत। ठेवून जीवन चालवा ॥६२॥

नंतर पारधी सावध। स्तुति करिती नानाविध ॥
क्षमा करावा अपराध। डोळे त्यांचे डबडबती ॥६३॥

त्यांना झालासे पश्चात्ताप। श्रीगुरुपद झाले प्राप्त ॥
धन्य सुकृत जाई पाप। जाती नमून गुरुपायां ॥६४॥



मृगमृगी मग त्या स्थानीं। अवचित येती पिण्यास पाणी ॥
अेकमेकां शोधिती वनीं। वत्सही दिसे गुरूकडे ॥६५॥

हरिण येतांच गुरूकडे। गुरु बोलती त्या रोकडे ॥
काय ओळख न सांपडे। माहुरचा तूं दत्त विप्र ॥६६॥

इतक्यांत हरिणी आली। गुरु म्हणती सावित्री भली ॥
तिनें उत्तम भक्ति केली। म्हणून आयुष्य घातलें ॥६७॥

तिचा पति तूं जिवंत होसी। आमुच्या कृपें गाणगापुरासीं ॥
पण पुढे तूं सत्पुरुषासी। अपार छळिलें कां बरें ॥६८॥

त्यामुळें आली अशी दशा। परी पूर्वीच्या भक्तिपाशा ॥
धरून आलों स्थानीं अशा। सत्य मनीं तूं ठेवणें ॥६९॥

इतक्यांत मृग दंपतीसी। वाचा फुटे नरासरसी ॥
लोटांगण घातलें गुरूसी। स्तुति करिती विविधपरी ॥७०॥

दीनमुखें मृग सांगत। रोगी विप्र निरोगी होत ॥
मेल्यानंतर बैल होत। भार्या सावित्री गाय बने ॥७१॥

तिसरा जन्म शूद्र जाती। वैदुरपुरीं झाली वस्ती ॥
स्त्रीसह भोगिले दुःख अती। पुत्र मारिती आम्हांसी ॥७२॥

चतुर्थ जन्मीं कोष्टी झालों। पत्नीसह फार कष्टलों ॥
काशीक्षेत्रीं आम्ही राहिलों। विश्वेश्वरासी सेविलें ॥७३॥

पण मला घडे व्यभिचार। त्यामुळें स्त्रीसह जन्म खर ॥
लत्ता मारी आम्हां कुंभार। नंतर सोनार जाहलों ॥७४॥

हस्तिनापुरांत राहिलों। लोभें सोनें चोरूं लागलों ॥
संत कृपेनें निभावलों। साधुसत्कार पत्नी करी ॥७५॥

दोघां चालू जन्म हरिण। आतां येत होतें मरण ॥
पूर्व पुण्यें देखिले चरण। श्रीगुरुराया दयाळा ॥७६॥

श्रीनरहरी दत्तात्रेया। सत्पुरुषां छळिलें वायां ॥
त्यामुळेंच दुःख भोगाया। विविध जन्मीं लागलेंसे ॥७७॥



तव कृपें आरोग्य मिळे। दुष्टभाव मनीं खवळे ॥
शुभ भाव चित्तीं मावळे। छलन घडलें गुरुराया ॥७८॥

तरी आतां कृपा करावी। तव पदांची भेट बरवी ॥
उद्धारगति आम्हां द्यावी। पस्तावून केली स्तुती ॥७९॥

अनुतप्त झालें हृदय। मग बोलती यतिराय ॥
नरजन्मींच गति होय। येईल जन्म ब्राह्मणाचा ॥८०॥

तुम्हां बाणे वैराग्यविचार। दक्षिण देशीं फिरत येणार ॥
तेव्हां भेट होतां सत्वर। सद्गति पावाल निश्चयें ॥८१॥

असें सांगती त्या पशूंला। गुरूला भक्तकळवळा ॥
जरी पापें दुःख भक्तांला। तरी श्रीगुरु तारिती ॥८२॥

पूर्वी केलेल्या सेवेसाठी। जन्मांतरींही गुरुभेटी ॥
गुरुभक्ति न होत खोटी। दत्तसावित्री तरती पुढें ॥८३॥

श्रीगुरुचरित्र पावन। पवित्र मनोहर पाहून ॥
त्या ठिकाणचे तपस्वीजन। आनंदानें उल्हासले ॥८४॥

गुरूला साष्टांग नमिती। प्रार्थून गुहेंत घेऊन जाती ॥
जातांना मृगा गुरु सांगती। पुढें भेटाल महाराष्ट्रीं ॥८५॥

मस्तकीं कृपाहस्त ठेवून। श्रीगुरु करिती सायंस्नान ॥
गुहेंत तपस्वी नमून। सेवा करिती बरवेपरी ॥८६॥

उदक कंद फळमूळ। तपस्वी देती तयेवेळ ॥
निवाराया थंडी सबळ। गुहा विवरीं अग्नि असे ॥८७॥

तपस्वी गुरूला विनविती। श्रीचरणीं एक विनंती ॥
आत्मानंदाची घडो प्राप्ती। अजून अभ्यासीं यश नसे ॥८८॥

गुरु म्हणती मग त्यांसी। याच देहीं ज्ञान तुम्हांसी ॥
होईल जाणा निश्चयेंसी। चिंता कांहीं करूं नका ॥८९॥

वेदविवरण करून। गुरु उपदेशिती ज्ञान ॥
तें ऐकून तपस्वी जन। समाधिसुखीं मग्न होती ॥९०॥

गुहेच्या पश्चिम बाजूस। व्याघ्रद्वय करिती वास ॥
कोणास त्यांचा नसे त्रास। ते ही गुहेंत पातले ॥९१॥

वृद्ध नृसिंह आत्मज्ञान। सांगत असतां तें ऐकून ॥
वाघही तटस्थ तल्लीन। पूर्वींचे विवादी विप्र हे ॥९२॥

श्रीगुरु व्याघ्रां विचारीत। तुम्ही वैदिक थोर पंडित ॥
आतां अंधारीं कोंपऱ्यांत। कांहो बसलां या स्थळीं ॥९३॥

तुम्हा असतां धर्मज्ञानीं। विप्रां त्रासविलें गहनी ॥
म्हणून ही उन्मत्त योनी। वाघां नरवाणी फुटे ॥९४॥

श्रीगुरुपदीं लोळण घेती। उद्धार करण्या विनविती ॥
शुद्ध चित्त पाहून सांगती। श्रीगुरु त्यांना त्यावेळीं ॥९५॥

उन्मत्त कधीं होऊं नये। उपद्रव कोणा देऊं नये ॥
आपला धर्म सोडूं नयें। शक्य तितकें सुख द्यावें ॥९६॥

वेदधर्म हा सनातन। त्याचें आचरण करून ॥
भावें गुरुपद सेवून। गति मिळेल निश्चित ॥९७॥

उत्तम क्षेत्र काशीपूर। ब्राह्मण कुलीं सदाचार ॥
तेथें जन्मून भवपार। कृपाकर शिरीं त्यांच्या ॥९८॥

तोंवर झाला सूर्योदय। चारही तपस्वी ब्रह्ममय ॥
त्यांचें मस्तक व्याघ्रद्वय। श्रीगुरु बोलें हुंगती ॥९९॥

सावध होऊन गुरुपाय। वंदितां सर्व आनंदमय ॥
अठ्ठावन्नावा पूर्ण अध्याय। श्रीगुरु घेती भक्तहिता ॥१००॥

श्रीगुरुदतात्रेयपर्णमस्तु



# अध्याय ५९ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:।।

दिनचर्या चालू होऊन। श्रीगुरूला घालिती स्नान ॥
भावें चाले गुरुपूजन । धन्य सुकृत तपस्व्यांचें ॥१॥

तेव्हां प्रेमें एक संन्यासी। श्रीगुरूला पहावयासी ॥
येता जाहला त्या गुहेसी। वाघां पाहून भीतसे ॥२॥

हिमालयाच्या पायथ्यासी। छत्तीस वर्षे अनुष्ठानासी ॥
दत्तदर्शन व्हावयासी। करी, परंतु निराश तो ॥३॥

एकदांही दत्तदर्शन। नाहीं म्हणून उदास मन ॥
म्हणे मानसीं कंटाळून। सर्व कांहीं झूठ आहे ॥४॥

यतीचें निरिच्छ मानस। होतां, स्वप्नीं दृष्टांत त्यास ॥
अरे होऊं नको उदास। श्रीदत्त तुला भेटेल ॥५॥

हिमाद्रिवरी पुण्य गुहा। आम्रवृक्षासमोर पहा ॥
यतिरूपें श्रीदत्त अहा। वसती जावें दर्शना ॥६॥

त्याप्रमाणें संन्यासी सकाळीं। येतां व्याघ्रभीति वाटली ॥
गुरुरायाची गोड बोली। ऐके, पावसी इष्टार्थ ॥७॥

गुरु त्रैमूर्ती दत्त होत। यति तापसी व्याघ्र पहात ॥
झाले समस्त आनंदित। लोटांगणे घालिताती ॥८॥

श्रीदत्त देती आशीर्वचन। आरति प्रदक्षिणा नमन ॥
करून स्थिर श्रीदत्तध्यान। नमन करूया सद्भावें ॥९॥

श्री हरिद्वार क्षेत्राप्रती। एकदां श्रीगुरु असती ॥
तेथें लोकांस त्रासविती। दोन मल्ल ब्राह्मण ॥१०॥

टाकून वैदिक वर्तन। देव धर्मा सदा निंदून ॥
नित्य पापाचरण करून। उन्मत्तपणें वर्तती ॥११॥

त्यांना कोणाचा धाक नसत। कोणाशीं कांहींही मागत ॥
न देतां त्यांना मारही देत। धनभार्यादिक हरिती ॥१२॥



त्यामुळें लोक फार त्रासले। शिव्या शाप देती सगळे ॥
अनाचारें दैव फिरलें। होती कुष्ठी महारोगी ॥१३॥

भीक मागती दारोदार। खोड्या आठविती अपार ॥
यापरी बारा संवत्सर। दारुण दु:ख भोगिलें ॥१४॥

वारंवार देवा स्मरती। मनोभावानें आळविती ॥
शरीर त्यजावें म्हणती। अनुताप त्यांना झालासे ॥१५॥

त्या समयीं श्रीगुरुमूर्ती। द्विजगृहीं भोजना बसती ॥
ब्राह्मणांचा धावा जाणती। उठून गेले एकदम ॥१६॥

ब्राह्मण गंगाघांटावर। तेथें गेले श्रीगुरुवर ॥
कुष्ठी द्विजां पद सत्वर। लावितां अंग पूर्ण बरें ॥१७॥

जेवणारे विप्र सगळे। गुरुमागोमाग धांवले ॥
पहाती अतर्क्य घडलें। रोगी स्तविती आदरें ॥१८॥

लोक जमले घांटावर। गुरूला स्तविती अपार ॥
एक दांभिक द्विजवर। पुसे गुरूस नामवर्ण ॥१९॥

तें ऐकून गुरु वदती। आधीं सांगतों तुझी स्थिती ॥
नंतर तव प्रश्न-रिती। कळेल विप्रा सावकाश ॥२०॥

पूर्वींचा तूं व्याध अससी। हस्तिनापुरांत वससी ॥
प्राणिवध खूप केलेसी। निष्ठुर अपार पातकी ॥२१॥

त्यामुळें तुझें नाक कापून। आणि नेत्रही फोडून ॥
दूर टाकिती राजे यवन। नंतर दोन जन्म झाले ॥२२॥

कांहीं सुकृत उगवलें। म्हणून विप्र-जनन झालें ॥
पण वळण नाहीं गेलें। काल रात्रीं गाय वधिली ॥२३॥

संध्याकाळची वेळ झाली। गुरु म्हणती हो मंडळी ॥
ब्राह्मणाचे घराजवळी। धेनुप्रेत पहाण्या चला ॥२४॥

मग सर्व तिकडे गेले। पुरलें तें प्रेत दाविलें ॥
विप्रमन अनुतापलें। शरण जात श्रीगुरूसी ॥२५॥

लोक नानापरी बोलती। श्रीगुरु ब्राह्मणा सांगती ॥
पश्चाताप जाहला चित्तीं। तर उठव तू गाईला ॥२६॥

श्रीगुरूला भावें नमून। विप्रें गुरुतीर्थ घेऊन ॥
शिंपिलें गाईवर नेऊन। धेनु जिवंत जाहली ॥२७॥

जयजयकार जाहला। ब्राह्मण पूजी श्रीगुरूला ॥
अत्यानंद सर्वांस भला। आशीर्वाद गुरु देती ॥२८॥

ब्राह्मण प्रश्नाचें उत्तर। सांगतीं तेव्हां गुरुवर ॥
रात्र झाली एक प्रहर। तरीही गर्दी लोकांची ॥२९॥

आम्ही यजुर्वेदी ब्राह्मण। नांव असे नृसिंहभान ॥
मूळपुरुष वटस्थान। दत्तनगर निवासी हो ॥३०॥

नंतर एक सांगे द्विज। मंत्र म्हणा हो योगीराज ॥
श्री नृसिंह गुरु सहज। वेद वेदांगें सार्थ म्हणती ॥३१॥

सर्व लोक झाले शरण। श्रीगुरुरायासी अनन्य ॥
वारंवार कृपा भाकून। श्रीगुरूला तोषविती ॥३२॥

गुरूंचे अमृत वचन। घालवावें सुखी जीवन ॥
देवं साधुसंत ब्राह्मण। अवश्य सदा वंदावें ॥३३॥

स्ववर्णाश्रमानें वागून। करावें ईश्वरोपासन ॥
भूतदया मृदुभाषण। शुद्ध मानसें करावे ॥३४॥

अंतरींच्या देवा जाणावें। सन्मार्गे सर्वदा वागावें ॥
देवासी प्रसन्न राखावें । आणि निघाले श्रीगुरू ॥३५॥

वटपत्रशायी मुकुंद। तेच हे नृसिंह गोविंद ॥
ज्ञानकांतीचा भान शब्द। शुद्ध परमात्मा श्रीगुरु ॥३६॥

दत्तावतारी गुरशरीर। सूचक बोलती गुरुवर ॥
श्रीगुरु-आशीर्वाद अमर। लाभे जनांला धन्यधन्य ॥३७॥

हरिद्वार क्षेत्रीं कांहीं काल। राहून चरित्रें पुष्कळ ॥
करून उपदेश निर्मळ। अन्यत्र गेले श्रीगुरु ॥३८॥



श्रीगुरु सर्वत्र फिरती। एकदां बंगाल प्रांतीं जाती ॥
कलकत्त्यांत लोकां दिसती। काली मंदिरीं श्रीगुरु ॥३९॥

त्यांची परीक्षा पहावयासी। दुष्ट करिती कापट्यासी ॥
त्यांचें पुढ्यात सुंदरशीं। मद्यमांस-भांडीं ठेविलीं ॥४०॥

आणि विनविती गुरूला। स्वीकारा पवित्र अन्नाला ॥
नावडे छळ काली देवीला। सुंदर स्त्रीरूपें येतसे ॥४१॥

यतीश्वरा नमन करी। लोकांस सांगे नानापरी ॥
श्रीगुरु यति दत्तावतारी। निंदा कोणी करूं नका ॥४२॥

स्पर्श करी त्या पात्रांसी। दुग्धरूप मद्यरसासी ॥
फळें जाहली उत्तमशीं। मांसरूप पालटलें ॥४३॥

मद्यमांसाचीं दूधफळें। पाहून छलक-ताठा गळे ॥
गुरु व कलिका त्यावेळे। गुप्त जाहलीं तात्काळ ॥४४॥

त्यांना भावें असो नमन। विचार करिती गहन ॥
तेथें पुढें प्रसिद्ध धन्य। कालीभक्त थोर साधु ॥४५॥

श्रीरामकृष्ण परमहंस। वाढविती भक्तिमार्गास ॥
बोधवचनें जन-मानस। धर्मनिष्ठ ते करिती ॥४६॥

शालिवाहन शकशतक। अठरांत इंग्रज लोक ॥
मुख्यत: विद्यातार्किक। भारतांत फैलाविती ॥४७॥

आंग्लविद्याविभूषित। इंग्रजी राज्य छान म्हणत ॥
धर्महीन त्यांचा आवडत। नेणती तत्त्व सनातन ॥४८॥

सर्वांतर्यामी एक तत्त्व। धर्म करी सर्वभूतहित ॥
श्रुतिस्मृति पुराणोक्त। वैदिक धर्म एकच ॥४९॥

जसा काल तसा अवतार। दिसे भारतीं निरंतर ॥
श्रीदेव विष्णु गदाधर। बंगाल राज्यीं अवतरले ॥५०॥

श्रीरामकृष्ण परमहंस। नरेंद्राची पुरविती आस ॥
जगांत येती प्रसिद्धीस। श्रीविवेकानंद स्वामी ॥५१॥



हिमालयांत ऋषिसिद्ध। नरेंद्रा देती आशीर्वाद ॥
त्रिकालज्ञानी योगीसंघ। हिमाद्रींत गुप्त वसती ॥५२॥

नरनारायण श्रीदत्त। लोकसुखा नित्य तपत ॥
नरेंद्रदत्त जनां सांगत। वेदधर्मबोध सदा ॥५३॥

कन्याकुमारी सागर। तेथें श्रीपाद शिळेवर ॥
विवेकानंदांस साक्षात्कार। भारतमातावैभवाना ॥५४॥

सिद्धाचरण जाणती सिद्ध। अलख निरंजनप्रबोध ॥
परमहंस विवेकानंद। दत्तप्रेरणा दिव्य असे ॥५५॥

श्रीगुरु नृसिंह सरस्वती। कालिकेस भेटून जाती ॥
सदा नानास्थानीं दिसती। सर्वां नमस्कार असो ॥५६॥

एकदां नृसिंह सरस्वती। श्री जगन्नाथ क्षेत्राप्रती ॥
श्रीशंकराचार्य पीठीं असती। वृद्ध नृसिंह नांवानें ॥५७॥

कांहीं काळ तेथें राहाती। शिष्यांस खरा बोध देतीं ॥
मग सोडून गादीप्रती। जाते झाले अन्य ठायीं ॥५८॥

वृद्ध नृसिंह सरस्वती। त्यांची वाढे बहुत कीर्ती ॥
अलवणी बुवा सांगती। प्रत्यय जगन्नाथ क्षेत्रींचा ॥५९॥

ते ब्रह्मचारी आचारवान। ब्राह्मण उत्तम विद्वान ॥
ते न खाती कधीं लवण। म्हणून नांव अलवणी ॥६०॥

ते धरून मनुष्यचार। धर्मशाळेंत त्यांस आजार ॥
त्यांची विचारपूस इतर। कोणीही नर न करिती ॥६१॥

चारी जण कळवळून। सांगती कोणी द्याहों भोजन ॥
यात्रा फार भरली असून। सात दिवस गेले असे ॥६२॥

पंगू रोगी अुपाशी दीन। यांचाच प्रसंगीं हवे दान ॥
परंतु असा विचार करून। नाहीं भेटला वागणारा ॥६३॥

भुकेचे कष्ट जरी अपार। बुवांचा विश्वास देवावर ॥
कळवळे नृसिंहअंतर। अलख शब्दें येत तेथें ॥६४॥

दीननाथ नृसिंहयती। त्या चारांच्या मस्तकाप्रती ॥
प्रेमें स्वचरण लाविती। आणि राहिले स्वस्थ उभे ॥६५॥

कटीवर हात ठेविती। कृपा दृष्टीनें निरखिती ॥
चारही सत्वर उठती। नमून प्रार्थिती यतिवरा ॥६६॥

बुवा पुसती श्रीगुरूला। पदस्पर्शे उत्साह आला ॥
दिसतां ईश्वर आम्हांला। निवासस्थान सांगावें ॥६७॥

श्रीगुरु म्हणती हंसून। सर्व विश्व आमुचें स्थान ॥
दत्तनगर काया धरून। नांव नृसिंह सरस्वती ॥६८॥

सह्यपर्वत गिरनार। काशीक्षेत्र पांचालेश्वर ॥
मातापूर कुरवपूर। हिमालय मेरूगिरी ॥६९॥

करंजनगर हरिद्वार। नृसिंहवाडी करवीर ॥
औदुंबर गाणगापूर। कुरुक्षेत्र अबू द्वारका ॥७०॥

जगन्नाथ क्षेत्र रामेश्वर। शंकरस्थानें पीठापूर ॥
विष्णुक्षेत्रें तशीं इतर। गणेश देवी सूर्याचीं ॥७१॥

आमुचींच स्थानें सकळ। पिंडब्रह्मांड एक मेळ ॥
सर्व ठिकाणीं सर्वकाल। वस्ती आमुची जाणावी ॥७२॥

वृद्धनृसिंह सरस्वती। यांचें भाषण चौघे ऐकती ॥
भारावून चरण धरिती। करिती स्तुति बहुविध ॥७३॥

भावें घालिती लोटांगण। तोंच जवळ घर निर्माण ॥
श्रीगुरु करिती भाषण। भुकी तुम्ही जेवा चला ॥७४॥

नवीन गृहीं जेवून तृप्त। तेथील सेवक आदरयुक्त ॥
विडे दक्षिणा त्यांना देत। सुखावह वारा घालिती ॥७५॥

थाटमाट होत बहुत। आजूबाजूचे लोक पहात ॥
स्तवन नमस्कार करीत। कांहीं गुरुपदां आलिंगिती ॥७६॥

भक्तत्राता तुम्हासारिखा। श्रीगुरु कोठें नाहीं देखा ॥
सर्व जनांचा देवा सखा। तूंच त्रिकालीं निश्चयें ॥७७॥



त्यांत होता जन्मांध विप्र। वेदशास्त्र संपन्न खूप ॥
प्रार्थी गुरूला भावें अमाप। विनंति करी श्रीपदीं ॥७८॥

श्रीगुरुराया आपणांसी। उत्सुक नेत्रीं पहावयासी ॥
तुम्ही ईश्वर निश्चयेसी। सफल करा मनोरथ ॥७९॥

त्याचें पाहुन शुद्धमन। गळ्यांतील हार काढून ॥
देती विप्रावर फेकून। ब्राह्मण सुखावे अंतरीं ॥८०॥

डोळ्यांस लाविला पुष्पहार। डोळे उघडले सत्वर ॥
गुरूला पाही डोळेभर। काय आनंद वर्णावा ॥८१॥

यात्रा जमली होती बहुत। लोटली तेथें भावें त्वरित ॥
नानापरी स्तवन होत। सर्वजणही आनंदले ॥८२॥

अलौकिक प्रसाद सेवून। लोक पावले समाधान ॥
पुनर्दर्शन व्हावें म्हणून। बुवा गुरूंस विनविती ॥८३॥

प्रसन्न श्रीगुरु सांगती। अक्कलकोटीं करूं वस्ती ॥
सहज दर्शन पुढती। होईल चिंता नसावी ॥८४॥

तेव्हां एक वृद्ध माणूस। भावें करून नमनास ॥
पत्नी चुकली आठदिवस। म्हणे पत्ता न लागला ॥८५॥

दया करा या दासावरी। मनोभावें विनंति करी ॥
मुलांसह स्त्री कोठेंतरी। यात्रेंत चुकली सांपडेना ॥८६॥

म्हणून मुकेन संसारासी। श्रीसमर्थ सांगती त्यासी ॥
मरणाच्या तूं दारीं बससी। तरी संसार हवा का ॥८७॥

कसा करिसी मनोजय। केव्हां होसी आनंदमय ॥
शरीर म्हणजे तूं काय। मनीं विचार करावा ॥८८॥

पूर्वीचा तूं आमुचा भक्त। जन्म तुझा तेली जातींत ॥
अजून नाहीं ओळखीत। भुललास रे विषयांसी ॥८९॥

सेवकांसी गुरु सांगती। भस्म लावणें कपाळासी ॥
मग उपजे ज्ञान मानसीं। होईल अंतीं उपयोग ॥९०॥



सेवकें त्याला भस्म लाविलें। तत्काळ वृद्धा ज्ञान झालें ॥
गुरुपदीं नमन केलें। विनवी भावें श्रीगुरूसी ॥९१॥

नृसिंह सरस्वती गुरु। कां हो केला मम अव्हेरू ॥
पूर्वीचा तेली खरोखरू। दास आपुला मी होतों ॥९२॥

तुम्ही गुरु दयाळु थोर। करावा उद्धार सत्वर ॥
पहावया तो चमत्कार। गर्दी अपार लोटली ॥९३॥

त्या गर्दींत बायको होती। पाहीं आपुल्या पतीप्रती ॥
प्रेमें कांतामुलें भेटती। त्या म्हाताऱ्या माणसा ॥९४॥

तेली म्हणें भार्या मुलांना। श्रीगुरूसी करा नमना ॥
आमचाच हा गुरुराणा। पूर्वजन्मज्ञान झालें ॥९५॥

भावें नमून विनविती। द्यावी आत्मानंद स्थिती ॥
श्रीगुरुही प्रेमें म्हणती। वासना पूर्ण होईल ॥९६॥

लोकां मिळे आशीर्वचन। गुरु पावले अंतर्धान ॥
नवें घरही पालटून। जातां चकित सर्वही ॥९७॥

अलवणी बुवा बडोद्यास। राहाती सांगती प्रत्ययास ॥
सद्भावें नमन सर्वांस। अगाधलीला श्रीगुरूची ॥९८॥

गुरु फिरती सदा सर्वत्र । देती सौख्य इहपरत्र ॥
श्रीगुरु नृसिंहचरित्र । कोणा न कळे पूर्णपणें ॥९९॥

दत्तावतारी काया धरून। गुरु तारिती नानाजन ॥
एकूणसाठावा अध्यायपूर्ण। अर्पिता दत्त सुप्रसन्न ॥१००॥

श्रीगुरुदत्तात्रेयर्पणमस्तु